बुधवार, २ फेब्रुवारी २०२२
राम प्रहर
वर्ष १४ • अंक १९६
www.ramprahar.com
पाने ६ • किंमत ₹ २ • रायगड



कटरा (जम्मू काश्मिर) : भूमिपुत्र, प्रकल्पग्रस्तांचे दैवत दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागू दे, असे साकडे कामोठेकरांनी आपल्या परिवारासह वैष्णोदेवी मातेला घातले.

अंतरंग

नवी मुंबई मनपा प्रभागरचना नियमबाह्य -आ. गणेश नाईक/३
'त्या' आरोपीचा पुन्हा पळण्याचा प्रयत्नही फसला/५
अंडर १९ वर्ल्डकपमध्ये आज भारत-ऑस्ट्रेलिया सेमीफायनल/६

## पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देश प्रगतिपथावर..

# डिजिटल इंडिया!

## सर्वसमावेशक आणि दिलासादायक अर्थसंकल्प

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी (दि. १) संसदेत २०२२-२३च्या आर्थिक वर्षासाठीचा प्रगती आणि आधुनिकतेकडे नेणारा अर्थसंकल्प सादर केला. सीतारामन यांचा हा चौथा, तर मोदी सरकारचा दहावा अर्थसंकल्प ठरला. सलग दुसऱ्या वर्षी अर्थमंत्र्यांनी टॅबच्या सहाय्याने अर्थसंकल्प मांडला. या अर्थसंकल्पात विविध क्षेत्रांसाठी तरतूद करण्यात आली असून सर्वसमावेशक अर्थसंकल्पाचे स्वागत होत आहे.**

### आत्मनिर्भरतेकडे मोठे पाऊल -पंतप्रधान



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अर्थसंकल्पाचे कौतुक केले आहे. ते म्हणाले की, या बजेटचा लाभ आपल्या देशातील युवा, मध्यमवर्ग, दलित, वंचितांना मिळणार आहे. या बजेटचे मोठे वैशिष्ट्य म्हणजे गरिबांचे कल्याण! प्रत्येक गरिबाकडे पक्के घर, नळाने पाणी, शौचालय, गॅसची सुविधा या सगळ्यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. यासोबतच आधुनिक इंटरनेट कनेक्टीव्हीटीवरही जोर देण्यात आला आहे. या बजेटमधून तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढणार. लघू व अन्य उद्योगांसाठी नव्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यातून सर्वांना फायदा होणार असून आत्मनिर्भरतेकडे मोठे पाऊल पडणार आहे.



### गरीबांसाठी ८० लाख घरे

पंतप्रधान आवास योजनेसाठी ४८ हजार कोटींची नव्याने तरतूद करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत ८० लाख घरे बांधण्यात येणार आहेत. मध्यमवर्गीय आणि गरिबांना परवडणारी घरे मिळावीत यासाठी खासगी बिल्डरांशी चर्चा करणार आहोत. मध्यस्थांमुळे वाढणारा खर्च कमी करण्याचा हा प्रयत्न असेल, अशी माहिती अर्थमंत्र्यांनी दिली.



### शेतकऱ्यांसाठी विशेष घोषणा

किसान ड्रोन्सचा वापर आता शेतीमध्ये केला जाणार असल्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. हे कृषी ड्रोन्स पिकांची पाहणी करणे, जमिनीच्या नोंदी ठेवणे तसेच किटकनाशकांच्या फवारणीसाठी वापरले जाणारे आहेत. कृषी आणि पीक उत्पादनासाठी तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर करण्यात येणार आहे. याशिवाय नऊ लाख हेक्टर शेतीच्या सिंचनासाठी ४४ हजार ६०५ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. लघू उद्योगांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना विकास करता यावा, त्यांनी नैसर्गिक शेतीला प्राधान्य द्यावे म्हणून विशेष अनुदान दिले जाणार आहे, तर खरीप आणि रब्बी पिकांसाठी देण्यात येणाऱ्या मदतीमधून एक कोटी शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.






> कोरोना काळात ज्यांना अडचणींचा सामना करावा लागला, ज्यांनी आपल्या प्रिय व्यक्ती गमावल्या त्यांच्याबद्दल संवेदना व्यक्त करते. आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. हा अर्थसंकल्प पुढील २५ वर्षांचा पाया घालणारा ठरेल. मी देशाच्या ७५ ते १०० वर्षांची ब्लू प्रिंट सादर करीत आहे.
> -निर्मला सीतारामन, केंद्रीय अर्थमंत्री

### रस्ते, रेल्वेचे जाळे पसरणार



अर्थसंकल्पात पंतप्रधान गतीशक्ती योजनेची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. यात रस्ते, रेल्वे, विमानतळ, बंदरे, वाहतूक, जलमार्ग, लॉजिस्टिक इन्फ्रा यांचा समावेश आहे. या अंतर्गत देशातील राष्ट्रीय महामार्गांचे जाळे २५ हजार किलोमीटरने वाढवण्यात येणार आहे, तर दुर्गम आणि डोंगराळ भागात रस्ते विस्तारण्यासाठी पर्वतमाला या योजनेची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय मेट्रो ट्रेनचा विस्तार करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे तसेच पुढच्या तीन वर्षांत ४०० वंदे भारत रेल्वेगाड्या सुरू केल्या जाणार असून रेल्वेचे जाळे विकसित करणार असल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले.

### डिजिटल करन्सी होणार लाँच



केंद्र सरकारने अर्थसंकल्पामध्ये डिजिटल करन्सीसंदर्भात मोठी घोषणा केली आहे. यंदाच्या आर्थिक वर्षापासून रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या माध्यमातून भारत स्वतःची डिजिटल करन्सी जारी करणार आहे. डिजिटल रूपी हे आभासी चलन ब्लॉकचेन आणि इतर तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उपलब्ध होईल. यामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. डिजिटल माध्यमातील क्रिप्टो करन्सीवर ३० टक्के कर आकारला जाणार आहे तसेच या ऑनलाइन व्यवहारांवर एक टक्का टीडीएस आकारला जाईल.

### करचना कायम

- ५ लाखांपर्यंत कोणताही कर नाही
- ५ ते ७.५ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर १० टक्के कर
- ७.५ ते १० लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर १५ टक्के कर लागणार
- १० ते १२.५ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर २० टक्के कर लागणार
- १२.५ ते १५ लाखांपर्यंतच्या उत्पन्नावर २५ टक्के कर लागणार
- १५ लाखांपुढच्या उत्पन्नावर ३० टक्के कर लागणार



### ६० लाख नवीन रोजगार

देशातील युवकांना रोजगार मिळवून देण्यासाठी अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. यामधून देशात नोकरीच्या ६० लाख नव्या संधी उपलब्ध होतील, अशी माहिती अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिली.

### इंटरनेटमध्ये ५जी क्रांती



सध्या इंटरनेट हा प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनला आहे. आता आपण ४जी स्पीड इंटरनेट सुविधा वापरत आहोत. त्याआधी ३जी सुविधा वापरात होती. इंटरनेट सुविधा अधिक कार्यक्षम आणि वेगवान करण्यासाठी आता लवकरच भारतातही ५जी सुविधेचा लाभ घेता येणार आहे. अर्थसंकल्प सादर करताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी ही घोषणा केली, जी भारताला प्रगतीकडे एक पाऊल पुढे घेऊन जाईल.

### स्वस्त होणार!



**कपडे, चामड्याच्या वस्तू, कृषी अवजारे, मोबाइल फोन व संबंधित उपकरणे, हिऱ्याचे दागिने, कॅमेरा लेन्स, इंधन, परदेशातून आयात होणारी केमिकल्स.**

### महागणार!



**क्रिप्टो करन्सीतील गुंतवणूक, कॅपिटल गुड्स, परदेशी छत्री.**

### क्रीडा विभागात 300 कोटींची वाढ

अर्थसंकल्पात क्रीडा बजेटमध्ये ३०५.५८ कोटी रुपयांची वाढ करण्यात आली आहे. सन २०२१-२०२२ या वर्षासाठी क्रीडा अर्थसंकल्प २७५७.०२ कोटी रुपये होता. आता २०२२-२३मध्ये क्रीडा अर्थसंकल्प ३०६२.६० कोटी रुपये झाला आहे.

## निवडक

### अनिल परब यांचे अवैध रिसॉर्ट पाडण्याचे आदेश

**मुंबई :** शिवसेना नेते आणि ठाकरे सरकारमधील मंत्री अनिल परब यांचे दापोलीतील अवैध रिसॉर्ट पाडण्याचा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. महाराष्ट्र कोस्टल झोन अथॉरिटीने या संबंधी माहिती दिल्याचे भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सांगितले. या संदर्भात त्यांनी ट्विट करीत 'अनिल परब का रिसॉर्ट तुटेगा', असेही म्हटले आहे.

### मध्य रेल्वेवर तीन दिवसांचा जम्बोब्लॉक

**मुंबई :** मध्य रेल्वेवरील ठाणे ते दिवादरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेच्या कामासाठी ५, ६ व ७ फेब्रुवारी या कालावधीत ७२ तासांचा जम्बोब्लॉक घेतला जाणार आहे. यात सहाव्या मार्गिकेमधील अंतिम टप्प्यातील कामे केली जाणार आहेत. या दरम्यान कोकणात जाणाऱ्या सर्व गाड्या तीन दिवस रद्द करण्यात आल्या आहेत, तर लोकलसेवेतही बदल केला गेला आहे.

## खारघरमधील सिडकोचे बंद विरंगुळा केंद्र सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केले खुले



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेल्या अनेक दिवसांपासून बांधून तयार झालेले मात्र बंद अवस्थेत असलेले खारघरमधील सिडकोचे विरंगुळा केंद्र मंगळवारी (दि. १) पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी नागरिकांसाठी खुले केले. सिडकोच्या दुर्लक्षामुळे विरंगुळा केंद्र बंद असल्याने ज्येष्ठांची गैरसोय होत होती. ती सभागृह नेते परेश ठाकूर यांनी दूर केली आहे.

सिडकोने खारघर सेक्टर ८मध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारले आहे, मात्र सिडकोकडे या केंद्राच्या उद्घाटनास वेळ दिसत नव्हता. तांत्रिक बाबींमुळे हे केंद्र सुरू होण्यास उशीर होत असल्याचे सांगण्यात येत होते. यामुळे परिसरातील नागरिकांची गैरसोय होत होती. ती लक्षात घेऊन पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी विरंगुळा केंद्र सुरू केले. या वेळी बोलताना त्यांनी सिडकोने आमच्या भूमिकेचे स्वागत करायचे की केस करायची हे त्यांनी ठरवावे, परंतु केंद्राचा वापर व्हावा आणि याचा फायदा नागरिकांना व्हावा हीच आमची भूमिका असल्याचे स्पष्ट केले.

सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासमवेत भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेविका आरती नवघरे, शहर सरचिटणीस कीर्ती नवघरे, युवा नेते समीर कदम, अमर उपाध्याय, केतन नवघरे, प्रभाग ६चे अध्यक्ष विलास निकम, संजय मुळीक, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अविनाश पाटील, सरचिटणीस श्री. मोरे, रमेश तपासे, अक्षय लोखंडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## ओबीसी आरक्षण संदर्भातील विधेयकावर राज्यपालांची स्वाक्षरी

**मुंबई : प्रतिनिधी**

ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेण्याच्या विधेयकावर राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी सही केली आहे. त्यामुळे याचे कायद्यात रूपांतर झाले आहे. आता आगामी निवडणुका पुढे ढकलल्या जातील का या संदर्भात निवडणूक आयोगाची भूमिका काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

याबद्दल मी राज्यपालांचे आभार मानतो आणि त्यांना धन्यवाद देतो तसेच राज्यातील जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्व पक्षांच्या आमदारांनी एकमताने जे विधेयक मंजूर केले त्यावर राज्यपालांनी शिक्कामोर्तब केल्याने राज्यात एक चांगले वातावरण तयार झाले आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

### कोट्यवधींचा कर्नाळा बँक घोटाळा

## विवेक पाटलांच्या जामीन अर्जावर आता ८ फेब्रुवारीला सुनावणी



**पनवेल : प्रतिनिधी**

बोगस कर्ज प्रकरणामुळे अडचणीत आलेले कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी ८ फेब्रुवारीपर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा तळोजा तुरूंगातील मुक्काम वाढला आहे.

विवेक पाटील यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) १५ जूनला पनवेलमधील राहत्या घरातून अटक केल्यापासून ते तुरूंगातच आहेत. त्यांच्या जामिनासाठी त्यांच्या वकिलांनी वरचेवर प्रयत्न केले आहेत, मात्र बँकेतील रकमेचा घपला आणि कर्जप्रकरणातील भ्रष्टाचार यामुळे सर्वसामान्य ग्राहकांशी संबंधित हे प्रकरण असल्याने विवेक पाटील यांना दिलासा मिळत नसल्याची चर्चा ज्येष्ठ वकिलांमध्ये आहे तसेच या प्रकरणाचा आर्थिक फटका बसलेल्या कर्नाळा बँकेतील ठेवीदारांना मात्र अद्याप कोणताही दिलासा मिळालेला नाही. दरम्यान, या वेळी न्यायालयाने पुढील सुनावणी ८ फेब्रुवारीला दुपारी २ वाजता करण्याचा निर्णय घेतला.

# शेतकऱ्यांना समर्पित अर्थसंकल्प -फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी (दि. १) संसदेत अर्थसंकल्प सादर केला आहे. त्यांनी तब्बल दीड तास अर्थसंकल्पाचे वाचन केले आणि पुढील आर्थिक वर्षासाठी काही महत्वपूर्ण घोषणा केल्या. महत्वाचे म्हणजे आरबीआयचे डिजिटल चलन येईल, अशी घोषणा या वेळी त्यांनी केली. सोबतच संरक्षण क्षेत्र संशोधनासाठी खुल करण्यात आले असल्याचे जाहीर केले आहे. तर, या अर्थसंकल्पावर विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना समर्पित अर्थसंकल्प अशी प्रतिक्रिया दिली आहे.

भारताला आत्मनिर्भर आणि अधिक बलशाली बनविणारा हा अर्थसंकल्प आहे. सर्वसामान्य माणूस, शेतकरी-कष्टकरी अशा सर्वच घटकांना दिलासा देत, भविष्याचा वेध घेणारा हा अर्थसंकल्प मांडल्याबद्दल पंतप्रधान मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार, असे फडणवीसांनी ट्वीटमध्ये म्हटलेय. आजचा अर्थसंकल्प



हा भारताला आत्मनिर्भर करणारा असून यामध्ये सर्वच घटकांना दिलासा देण्यात आल्याचे त्यांनी म्हटलेय.

हा अर्थसंकल्प आत्मनिर्भर आणि बलशाली भारताचे प्रतीक आहे. शेतकऱ्यांना समर्पित अर्थसंकल्प अर्थमंत्र्यांनी मांडला. तसेच शेती क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करण्यासंदर्भात महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. ड्रोनचा शेतीसाठी वापर करून घेतला जाणार आहे. शेतकऱ्यांना बाजार उपलब्ध व्हावा, कोणत्याही मध्यस्थाशिवाय त्यांच्या मालाची थेट विक्री करता यायला पाहिजे, त्यांना शेतमालाचा योग्य भाव मिळाला पाहिजे, यासाठी विशेष सवलती या अर्थसंकल्पात करण्यात आल्या, असे फडणवीसांनी सांगितले.

## 'आगामी २५ वर्षांतील प्रगतीसाठी देशाला सज्ज करणारा अर्थसंकल्प'

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा सर्वसामान्य माणसाला सोबत घेऊन देशाला आत्मनिर्भर आणि संपन्न बनविण्यासाठीचा ऐतिहासिक अर्थसंकल्प आहे. आगामी पंचवीस वर्षांतील प्रगतीसाठी देशाला सज्ज करणाऱ्या या अर्थसंकल्पासाठी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो आणि निर्मला सीतारामन यांचे अभिनंदन करतो, अशी प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केली.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, कोरोनाच्या संकटातून बाहेर पडणाऱ्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा वेग वाढवून देशात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती व्हावी यावर अर्थसंकल्पात भर देण्यात आला आहे. गुंतवणूक, उत्पादन, शेती, शिक्षण, सामाजिक कल्याण, ग्रामविकास, शहरांचा विकास, वैद्यकीय सुविधा अशा सर्व क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून देश आर्थिकदृष्ट्या प्रगत व्हावा आणि त्याचबरोबर स्वदेशी उद्योगांना चालना देऊन देश आत्मनिर्भर व्हावा यासाठी महत्त्वाच्या तरतुदी या अर्थसंकल्पात करण्यात आल्या आहेत.

ते म्हणाले की, डिजीटल रुपया, किसान ड्रोन्स, लष्करी उत्पादनांमध्ये आत्मनिर्भरता वाढविण्यासाठीची तरतूद, ग्रामीण आणि वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळण्यासाठी शैक्षणिक चॅनेल्स वाढविणे, डिजीटल विद्यापीठ, जमिनीची कागदपत्रे डिजिटल स्वरुपात, ई पासपोर्ट, राज्यांच्या विकासासाठी एक लाख कोटींचा निधी हे संकल्प अत्यंत कल्पक आणि उपयुक्त आहेत.

# जनतेचा विकास हेच माझे ध्येय -आमदार रविशेठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

रस्त्याबरोबर अनेक विकासकामांचे कामेसुद्धा होणार आहेत. मी कधीही राजकारण केले नाही पेण तालुक्याचा विकास हेच माझे ध्येय असल्यामुळे पेण तालुक्यात मी भरभरून आमदार निधी देऊन गावांचा विकास करण्याचे ध्येय ठेवले आहे, असे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी केले. पेणमध्ये विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण झाले. त्या वेळी ते बोलत होते.

पेण तालुक्यातील खरोशी येथील राष्ट्रीय महामार्ग ते खरोशी गाव मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून मंजुर झालेल्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे उद्घाटन, केळंबादेवी मंदिराजवळील सभामंडपाचे लोकार्पण, खरोशी धरणवाडी साकवाचे लोकार्पण, खरोशी गावातील अंतर्गतरस्त्याचे भूमिपूजन, असे एकुण एक कोटी



(छाया : अनिस मणियार)

आठ लाखांच्या विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण आमदार रविशेठ पाटील यांचे हस्ते करण्यात आले. यात खरोशी फाटा ते खरोशी गाव रस्ता डांबरीकरणाचा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेद्वारे ९३ लाख खर्चातून होणार आहे.

या वेळी भाजपचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, भाजप तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, पं. स. सदस्य मालती म्हात्रे, पुजा घरत, वासुदेव म्हात्रे, भाजप तालुका उपाध्यक्ष महेश घरत, अनंता पाटील, गंगाराम पाटील, सविता पाटील आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

येथील शेतकरी भाजीपाला पिकवणारे शेतकरी आहेत. त्यांच्या भाजीपाला वाहतुकीचा प्रश्न येथील साकवच्या बांधकामामुळे सुटणार आहे. येथील विजेचा प्रश्न सोडविला आहे. येथील शेतकरी भाजीपाला पिकवत असुन येथील नदीवर बंधारा बांधण्यासाठी प्रयत्न करणार आहे, तर या गावातील विकास कामासाठी अतिरिक्त निधी देणार असल्याचे आमदार रविशेठ पाटील यांनी या वेळी सांगितले.



**पनवेल : नगरसेविका दर्शना भोईर यांच्या नगरसेवक निधीमधून जय भारत नाका आणि लाईन आळीतील हनुमान मंदिराजवळ हायमास्ट उभारण्यात आले आहेत. या हायमास्टचे लोकार्पण सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, तसेच अरुणा पाटील, मधुकर मुंबईकर, वासंती कुरघोडे, शेखर भोपी, यतीन देशमुख, मंदार देसाई, तुषार कापरे, बाळू डायमा, संदीप सातारकर आदी उपस्थित होते.**

# खारघरमध्ये होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या भूखंडाचा पाहणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून खारघर सेक्टर ८ प्लॉट नंबर ९ मधील भुखंडावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात येणार आहे. या भुखंडाची सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी (दि. १) पाहणी करून आढावा घेतला.

या वेळी भाजपचे खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेविका आरती नवघरे, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, खारघर शहर सरचिटणीस कीर्ती नवघरे, युवा नेते समीर कदम, अमर उपाध्याय, केतन नवघरे, प्रभाग ६ अध्यक्ष विलास



निकम, संजय मुलिक, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अविनाश पाटील, सरचिटणीस श्री. मोरे, रमेश तपासे, अक्षय लोखंडे आदी उपस्थित होते.



**तळोजा : मन्नार कॉलनीमधील रहिवाशांना पावसाळ्यात पाणी तुंबण्याची समस्या भेडसावत आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी लोकप्रतिनिधींसह या ठिकाणी असलेल्या नाल्यांची पाहणी केली. या वेळी नगरसेवक हरेश केणी, पापा पटेल, खारघर शहर सरचिटणीस किर्ती नवघरे, मुनाफ पटेल, समीर कदम यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना उद्भवणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत असतात. त्या पार्श्वभूमीवर सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मन्नार कॉलनीतील समस्यांची पाहणी केली.**

## इस्त्राईलच्या राजदूतांनी घेतली पनवेल महापालिका हद्दीतील उपक्रमांची माहिती



**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेलमधील इस्त्राइली दफनभूमीचा विकास करावा, तसेच त्या अनुषंगाने असणाऱ्या विविध विषयांवरती चर्चा करण्यासाठी मंगळवारी (दि. १) इस्त्रायलचे मुंबईतील वाणिज्यदूत कोबी शोशानी आणि इस्त्राईल वाणिज्यदूतातील विशेष प्रकल्प अधिकारी अनय जोगळेकर यांनी आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेतली.

पनवेलमध्ये अनेक वर्षापासून इस्त्रायली लोकांची वसाहत असून त्यांची दफनभूमी तसेच इतर धार्मिक स्थळे आहेत. त्यांचा विकास महापालिकेने करावा या हेतूने इस्त्रायलचे राजदूत कोबी शोशनी यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याशी चर्चा केली. या वेळी पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रस्तावित विविध उपक्रमांची माहिती आयुक्तांनी शोशांनी यांना दिली.

## दुखवटा

### शकुंतला काळे

**मोहोपाडा :** रोटरी ऑफ क्लब पाताळगंगाचे अध्यक्ष गणेश काळे यांच्या मातोश्री शकुंतला काळे (वय ७६) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, एक मूलगी, जावई सहा नातवंडे असा परिवार आहे. एचओसी प्रायमरी स्कूल येथे प्रदीर्घ काळ सेवेत असलेल्या शकुंतला काळे यांचा समाजसेवेत सतत खारीचा वाटा असायचा. त्यांचा दशक्रिया विधी सोमवारी (दि. ७) उद्धर रामेश्वर पाली येथे व तेरावा गुरुवारी (दि. १०) घरी श्री हरी पार्क, रीस येथे होणार आहे.



### लक्ष्मीबाई भागवत

**नवी मुंबई :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, केंद्रीय सदस्य नामदेव भागवत यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई मारुती भागवत (वय ८७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कै. लक्ष्मीबाई यांच्या शोकसभेचे आयोजन गुरुवारी (दि. ३) सकाळी जुईनगर सेक्टर २५ चिंचोली तलाव ज्येष्ठ नागरिक केंद्रात करण्यात आले आहे.





**खारघर : सेक्टर ४ मधील कै भजनसम्राट महादेवबुवा घरत ज्येष्ठ नागरिक उद्यानामध्ये गेट व फुटपाथ येथे पायरी बसविण्यात आली. या कामी भाजप नेते प्रभाकर घरत यांनी सिडकोकडे पाठपुरावा केला होता.**

## सिफेरर्स संघटनेच्या युनिटचा शुभारंभ

**पनवेल : वार्ताहर**

ऑल इंडिया सिफेरर्स अ‍ॅण्ड जनरल वर्कर्स यूनियनच्या नवी मुंबई यूनिटचा शुभारंभ यूनियन अध्यक्ष संजय वासुदेव पवार यांनी मंगळवारी (दि. १) श्रीफळ वाढवून केला. या वेळी डीन शिपिंग अ‍ॅण्ड ऑफशोर मॅनेजमेंटचे कामगार यूनियनमध्ये सहभागी झाले. त्या ११० कामगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

बेरोजगार हाताना काम, त्याची सुरक्षा, तसेच कामगार हक्कांचे कुठे ही उल्लंघन होऊ नये व वैश्विक संकटातून बाहेर पडत असताना रोजगार उपलब्ध करून देणे, असे यूनिटचे धोरण असल्याचे यूनियन अध्यक्ष संजय पवार यांनी सांगितले.

या वेळी यूनियन कार्याध्यक्ष अभिजित सांगळे, खजिनदार शितल मोरे, उपाध्यक्ष सुनील भोसले, उपाध्यक्ष सुरेश चौधरी, सरचिटणीस बंटी राणे, संघटक शमिका गवळी, संयोजिक स्वाती पाटील, नवी मुंबई पदाधिकारी रोशन कोळी, अक्षय कोळी, तुषार डिकुळे आणि यूनियनचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येत आहे की, मौजे केगाव, तालुका उरण, जिल्हा रायगड महाराष्ट्र राज्य येथील डॉ. सोजर रॉसी, राहणार : मौजे केगाव, तालुका उरण, जिल्हा रायगड यांच्या मालकी हक्काची व ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे केगाव, तालुका उरण, जिल्हा रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रु.पैसे.) |
|---|---|---|---|
| १८५ | ८/ड | ०:७३:०० | २.२४ |

तरी सदरहु जागा, जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, विकासनकरार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, संपादन, भाडेपट्टा, साठेकरार, लिज, तबदली, ट्रस्ट, मृत्युपत्र, विक्रीचा करार, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर सक्षम वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही प्रकारच्या हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकती हया निर्वेध व बोजाविरहित आहेत व हरकत असल्यास ती सोडुन दिली आहे असे गृहित धरुन आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे आशिल हे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत याची कृपया नोंद घेण्यात यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०२/०२/२०२२

**सही/-**
**अ‍ॅड. मनीषा पवार**
पत्ता : २०१, प्रॉक्सीमा बिल्डींग, सेक्टर ३०अ, प्लॉट नं. १९, वाशी, नवी मुंबई
मोबाईल : ८०८०८१९३१६




पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
बुधवार, दि. २ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड

सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट : १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. क्रीडा संकुल, एचओसी, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे ■ ९. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. आंबेडकर भवन, पनवेल ■ १४. सेंट्रल रेल्वे, पनवेल ■ १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

कोवॅक्सिन

- १. काळभैरव कार्यालय, कळंबोली ■ २. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ३. काळण समाज हॉल, पनवेल (१५ व १८ वर्षांवरील वयोगटासाठी)
- ४. निमिष हेल्थ सेंटर, खारघर (१५ व १८ वर्षांवरील वयोगटासाठी)
- ५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

पनवेल ग्रामीण लसीकरण

- वळवली राजीप शाळा
- कोयनावेळे राजीप शाळा
- तळोजे मजकुर राजीप शाळा
- रोहिंजण राजीप शाळा
- पालेखुर्द राजीप शाळा
- कळंबोली काळभैरव मंदिर सभागृह
- मुर्बी राजीप शाळा
- पेंधर राजीप शाळा
- आसुडगाव राजीप शाळा

१५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- कोकण एज्युकेशन सोसायटी के. व्ही. हायस्कूल पनवेल (उपलब्ध लसी ५००)
- केशरचंदजी आनंदरामजी बांठिया शाळा न्यू पनवेल (५००)
- सी. के. ठाकूर विद्यालय मराठी इंग्रजी माध्यमिक, न्यू पनवेल (५००)
- एस. ई. एस. मराठी माध्यमिक हायस्कूल कळंबोली (५००)
- केपीसी स्कूल, खारघर (५००)
- रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर (५१८)
- एपीजे स्कूल, खारघर (५००)
- सुषमा पाटील मराठी-इंग्रजी माध्यम हायस्कूल कामोठे (५००)
- लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्रजी माध्यमिक सेकेंडरी स्कूल, कामोठे (४१९)

## निवडक

### खारघरमध्ये मंदिराची दानपेटी फोडली

**पनवेल :** खारघर येथील एका मंदिराची दानपेटी फोडून अज्ञात चोरट्यांनी लाखो रुपये चोरुन नेल्याची घटना घडली आहे. खारघर येथे असलेल्या इस्कॉन मंदिरात अज्ञात चोरट्यांनी दानपेटी फोडून तेथे गोळा झालेले लाखो रुपये चोरुन नेले आहेत. या घटनेची माहिती मिळताच खारघर पोलीस घटनास्थळी व परिसरात असलेले सीसीटीव्ही आदींच्या माध्यमातून या अज्ञात चोरट्यांचा शोध खारघर पोलीस घेत आहेत.

### फेरीवाल्यांकडून अवैध दारू विक्री

**पनवेल :** खारघर वसाहतीमध्ये बेकायदेशीररित्या भाजी विक्रेते करणारे काही फेरीवाले हे आता दारुविक्रीसुद्धा करीत असल्याने त्यांच्या विरोधात खारघर पोलीस कारवाई करणार आहेत. खारघर वसाहत ही नो लिकर झोन म्हणून शासनाने जाहीर केले आहे. त्यामुळे तेथे दारु विक्रीस बंदी आहे, असे असतानाही खारघर वसाहतीमधील अनेक अनधिकृत फेरीवाले हे भाजी विक्री करताना पाठीमागील बाजूस खुलेआम दारु विक्री करीत असल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे. या संदर्भात स्थानिक नागरिकांनी खारघर पोलीस व पनवेल महापालिका यांनासुद्धा याची माहिती दिली असून कारवाईची मागणी केली आहे. त्यामुळे या व्हिडीओची चाचपणी करून त्यानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

# नवी मुंबई मनपा प्रभाग रचना नियमबाह्य

## आमदार गणेश नाईक यांचा आरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी करण्यात आलेली प्रभाग रचना चुकीच्या आणि नियमबाह्य पध्दतीने झाली असून त्या विरोधात भाजप न्यायालयात जाणार आहे, असा इशारा आमदार गणेश नाईक यांनी दिला आहे. राजकीय फायद्यासाठी जनतेची गैरसोय केल्याचे या प्रभाग रचनेतून दिसून येते आहे, असेही नाईक यांनी म्हटले आहे.

नवी मुंबई महापालिकेची निवडणूक एप्रिल २०२२मध्ये होणे अपेक्षित आहे. यंदाच्या निवडणुकीसाठी पालिका क्षेत्रात ११ नवीन प्रभागांची भर पडली आहे. त्यामुळे एकुण प्रभागांची संख्या १११ वरून १२२वर गेली आहे. सोमवारी मध्यरात्री ही नवीन प्रभाग रचना महापालिका प्रशासनाने पालिकेच्या संकेतस्थळावर अपलोड केली.



नवीन प्रभाग रचनेवर तीव्र आक्षेप घेत आमदार गणेश नाईक यांनी प्रभाग रचना करणाऱ्या पालिकेच्या अधिकाऱ्यांनी सत्ताधारी राजकीय पक्षांच्या दबावाखाली या पक्षांना लाभ पोहचविण्यासाठीच प्रभाग रचना चुकीच्या पध्दतीने केली आहे, असा आरोप केला आहे. यामध्ये पालिकेचे अधिकारी आणि प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी सहभागी आहेत. शहराच्या एकुण लोकसंख्येला एकुण प्रभागांनी भागून जे उत्तर येईल तेवढी सरासरी लोकसंख्या एका प्रभागाची असायला हवी होती, मात्र संबधित अधिकाऱ्यांनी सत्ताधारी राजकीय पक्षांना लाभ पोहचविण्यासाठी प्रभाग रचनेचे चुकीचे गणित केले आहे. पालिका निवडणुकीच्या संभाव्य प्रभाग रचनेत बेकायदा काम होण्याची शक्यता लोकनेते आमदार नाईक यांनी राज्यपाल, निवडणुक आयोग, जिल्हाधिकारी, पालिका आयुक्त या सर्वांना अगोदरच वेळोवेळी पत्र पाठवून व्यक्त केली होती. तरीदेखील प्रभाग रचनेमध्ये हेराफेरी झालीच आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

ऐरोली विधानसभा क्षेत्रातील ऐरोली, दिघा या भागातील प्रभाग २३ हजार लोकसंख्येचे केले आहेत. त्यामुळे ऐरोली विधानसभा क्षेत्रात जास्त प्रभाग झाले आहेत, तर बेलापूर विधानसभा क्षेत्रात ३० हजार लोकसंख्येचे प्रभाग केल्याने या विधानसभा क्षेत्रातील प्रभागांची संख्या कमी झाली आहे. १२२ प्रभागांपैकी अनेक प्रभागांमध्ये चुकीची रचना करण्यात आली असून याविरोधात कोर्टात दाद मागणार आहे. ज्या ज्या प्रभागात चुकीची प्रभाग रचना करण्यात आली आहे. त्या प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात येणार असून निष्णात वकीलांची नियुक्ती करणार आहे, असे लोकनेते आमदार नाईक म्हणाले.

नवीन प्रभाग रचनेत तीन तीन किलोमिटरचे प्रभाग तयार झाले असून त्यामुळे जनतेची प्रचंड गैरसोय होणार आहे. राजकीय फायद्यासाठी नियम डावलून ही प्रभाग रचना तयार करण्यात आली आहे. पालिकेच्या ज्या अधिकाऱ्यांनी राजकीय दबावापोटी चुकीची आणि नियमाबाह्य प्रभाग रचना केली आहे. त्यांची चौकशी करावी आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी केली आहे.

## कामोठ्यात सिलिंडरचा स्फोट; परिसरातील घरांचे नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे वसाहतीमधील एका भोजनालयात मंगळवारी (दि. १) सिलिंडर स्फोट झाला. या आगीमुळे त्या भोजनालयासह बाजूला असलेल्या दोन घरांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झाली नाही.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ११ येथे असलेल्या स्वस्तिक प्लाझा या इमारतीत जयंतीलाल यांचे भवानी भोजनालय आहे. या ठिकाणी मंगळवारी सायंकाळी ७च्या दरम्यान सिलिंडरचे स्फोट झाले. स्फोटामध्ये बाजूच्या घरांनासुद्धा आग लागून त्यांचे मोठे नुकसान झाले. स्फोटाच्या आवाजामुळे आजूबाजूचे सर्व रहिवासी घराबाहेर पडल्यामुळे कुठलीही जिवीतहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच कामोठे पोलीस ठाण्याचे पथक तसेच पनवेल अग्निशमन दलाचे बंब व कळंबोली अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी पोहचून त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविले.

कामोठे वसाहतीमधील लोकसंख्या वाढत चालली आहे. त्याचप्रमाणात आगीचे प्रकारही वाढत आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासनाने व सिडकोने आरक्षित करून ठेवलेल्या भूखंडावर अग्निशमन केंद्र उभारावे तसेच या ठिकाणी कायमस्वरुपी अग्निशमन बंब उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी भाजप कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी यांनी केली आहे.

## कळंबोलीत स्वच्छता आणि धुरीकरण

### पनवेल महापालिकेतर्फे उपक्रम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ब'मधील कळंबोली प्रभाग १० येथे मंगळवारी (दि. १) स्वच्छता व धुरीकरण करण्यात आले.

पनवेल महापालिकेच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महापालिका क्षेत्रात अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. यासोबतच स्वच्छ सर्वेक्षण २०२२मध्ये पनवेल महापालिकेच्या माध्यमातून चांगले काम करून स्वच्छ पनवेल सुंदर पनवेल करण्याच्या दृष्टीकोनातून पाऊले उचण्यास येत आहेत. त्यादृष्टीकोनातून मंगळवारी कळंबोली सेक्टर २ मधील हनुमान मंदिर ते सेन्ट जोसेफ शाळेपर्यंत फूटपाथवरील माती व साफसफाई आणि जंतूनाशक अथवा धुरीकरण औषधफवारणी करण्यात आली. या प्रकारे सेक्टर २मध्ये विशेष जनजागृती स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.



या वेळी प्रभाग समिती 'ब'च्या सभापती प्रमिला पाटील, नगरसेवक अमर पाटील, नगरसेविका मोनिका महानवर, भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, उत्तर भारतीय अध्यक्ष केशव यादव, कळंबोली शहर मंडळ उपाध्यक्ष संदीप भगत, राजू दळवी, प्रभाग समिती 'ब'चे आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, आरोग्य निरीक्षक संजय जाधव, स्वच्छता निरीक्षक अमोल कांबळे, स्वच्छता पर्यवेक्षक हरेश कांबळे, दीपक गवळी, राजेंद्र जाधव, सुपरवायझर दिपक म्हात्रे, विशाल खानावकर व स्वच्छता दूत उपस्थित होते. अभियानचे आयोजन कळंबोली शहर मंडळ सरचिटणीस दिलीप बिष्ट यांनी केले होते.

## वेश्या व्यवसाय करण्यासाठी आणलेल्या मुलींची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

वेश्या व्यवसाय करण्यासाठी परराज्यातून आणलेल्या सहा मुलींची अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक गुन्हे अन्वेषण विभागाने नवीन पनवेल परिसरातून सुटका केली आहे.

नवीन पनवेल परिसरातील सेक्टर ७ या ठिकाणी साधारण दोन महिन्यापूर्वी रो-हाऊस भाड्याने घेऊन दोन व्यक्तींनी त्या ठिकाणी राजस्थान, उत्तरप्रदेश व दिल्ली या ठिकाणावरून सहा मुली आणल्या होत्या. या मुलींना लेडीज बारमध्ये, तसेच ज्या प्रमाणे गिऱ्हाईक असतील अशांकडे पाठविण्यात येत असे. याबाबतची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक पराग सोनावणे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने या रो-हाऊसवर छापा टाकून त्या ठिकाणावरून सहा मुलींना ताब्यात घेतले आहे. यामध्ये दोन मुली अल्पवयीन असल्याचे समजते.

रो-हाऊसमधून सहा मुलींना ताब्यात घेतले आहे. त्यातील दोन मुली अल्पवयीन असल्याचे समजते. या संदर्भात वैद्यकीय अहवाल आल्यानंतरच खरी माहिती समजेल. या मुली परराज्यातील असून पकडण्यात आलेले आरोपीसुद्धा परराज्यातीलच आहेत, असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग सोनावणे यांनी सांगितले.

## खारघरमधील रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्यवसाय योजना स्पर्धा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील लेखा आणि वित्त विभागाने व्यवसाय योजना स्पर्धेचे आयोजन केले. प्राचार्य डॉ. संजय मराठे यांनी या स्पर्धा सध्याच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे नमुद केले.

या वेळी आयोजित स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील लेखा आणि वित्त विभागातील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे लघु व्यवसाय, महिलासाठी घरघुती व्यवसाय योजनाचे सादरीकरण केले. या स्पर्धेसाठी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी उत्तम प्रतिसाद दिला. या स्पर्धेचे आयोजन लेखा आणि वित्त विभागाच्या प्रा. मानसी शाहा यांनी केले. हिरल पंडया यांनी स्पर्धेचे निरीक्षण केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी उपयुक्त असल्याचे नमूद करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

## ओवळेनजीक ब्लास्टिंगमुळे घरांचे नुकसान

### सिडकोविरोधात ग्रामस्थ आक्रमक

**पनवेल : वार्ताहर**

ओवळे गावाच्या बाजूलाच असलेल्या डोंगरावर मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केले जात आहे. या ब्लास्टिंग तीव्रता मोठी असल्याने ओवळेसह कुंडेवहाळ, डुंगी, पारगाव गावातील अनेक घरांना तडे गेले आहेत. यावर ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त करीत सिडकोने ब्लास्टिंगचे काम थांबवावे किंवा तीव्रता कमी करावी, अशी मागणी केली आहे तसेच कार्यवाही न झाल्यास सिडकोविरोधात मोर्चा काढण्याचा इशारा दिला आहे.

आधीच नवी मुंबई विमानतळाला प्रकल्पग्रस्तांचे दैवत दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी सिडको व राज्य सरकारने डावलून शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव पुढे आणले आहे. गेल्या काही दिवसांपासून ओवळे परिसरात मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केले जात आहे. माईन्स ॲक्टनुसार संबंधिताला काम करण्यास शासकीय यंत्रणेकडून मंजुरी देण्यात आली आहे. त्या अटी आणि शर्थीचा भंग झाला आहे. ब्लास्टिंगमुळे नुकसान किंवा मनुष्यहानी झाल्यास सिडको व ठेकेदारावर गुन्हे दाखल करू, असा इशारा लोकनेते दि. बा. पाटील २७ गाव प्रकल्पबाधित कृती समितीच्या वतीने देण्यात आला आहे. समितीने सिडको तसेच पोलीस प्रशासनाला पत्र दिले असून याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा, अन्यथा सिडकोविरोधात जनआंदोलन उभारू, असा इशारा दिला असल्याचे अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांनी सांगितले.

या संदर्भात गोवर्धन डाऊर, चंद्रकांत पाटील, ॲड. प्रशांत भोईर, कांचन घरत, सुभाष पाटील, करण भोईर, अमित वास्कर, सुहास पाटील, सुनील म्हात्रे, रूपेश मोहिते, पंढरीनाथ पाटील, प्रेम पाटील, किरण केणी, चेतन डाऊर, सुरज शेलार, विजय भगत, संतोष पवार, कैलास तारेकर, अंबाजी डोलकर, प्रल्हाद पाटील, कायदेशीर सल्लागार, ॲड. राहुल मोकल, ॲड. जितेंद्र म्हात्रे, ॲड. प्रदीप मुंडकर, ॲड. विशाल मुंडकर, सल्लागार पुंडलिक म्हात्रे, गजानन पाटील, महेंद्र पाटील, संजय पाटील, जयवंत परदेशी, मयूर भोईर, तुकाराम वास्कर, सुधाकर कोळी, विवेक मोकल, महेंद्र पाटील, विजय शिरढोणकर, रूपेश धूमाल, संजय घरत, रवींद्र म्हात्रे, विक्रांत घरत, दत्तात्रेय पाटील, किरण पवार, प्रकट कडू, विशाल भोईर, शिवदास पाटील, सुनील कटेकर, उमेश खांदेकर, सचिन कावळे पाठपुरावा करताहेत.

## कुंडेवहाळमध्ये माहेरवाशिणींचा हळदीकुंकू समारंभ उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावात माहेरवाशिणींचा आदर सत्कार व हळदीकुंकू समारंभ रविवारी (दि. ३०) आयोजित करण्यात आला होता. 'माहेरवाशीण तू कुंडेवहाळ गावची' या नावाने हा कार्यक्रम कुलुमाता मंदिरात उत्साहात झाला.



या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेविका दर्शना भोईर, भाजप उलवे नोड महिला अध्यक्ष योगिता भगत, दापोलीच्या सरपंच प्रशाली डाऊर, मानघरच्या सरपंच संगीता पाटील, नानोशी ग्रामपंचायत सदस्य विनंती पाटील आदी उपस्थित होत्या.

कुंडेवहाळ गावातील ज्या मुली लग्न होऊन सासरी गेल्या आहेत त्यांचा आदर सत्कार करण्यासाठी त्यांना गावात बोलविण्यात आले होते. या कार्यक्रमानिमित्त माहेरवाशिणींनी जुन्या मैत्रिणींसोबत विचारांची देवाणघेवाण, जुन्या आठवणींना उजाळा दिला व या उपक्रमाबद्दल आयोजकांचे आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, तेजस्विनी महिला ग्रामसंघ, सर्व महिला मंडळ व ग्रामस्थ मंडळ यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या युवकवर्गाला, ग्रामस्थांना, विविध स्वरूपात देणगी देणाऱ्यांना आयोजकांनी धन्यवाद दिले.

कुंडेवहाळ ग्रामस्थांच्या विनंतीला मान देऊन जवळपास ४००हून माहेरवाशिणी कार्यक्रमाला उपस्थित होत्या. त्यांची उत्तम व्यवस्था ग्रामस्थांनी केली होती. त्यांना तिळगूळ, पुरणपोळीचे गोडाधोडाचे जेवण देऊन हळदीकुंकवाचे वाण देण्यात आले. यासोबतच चला जिंकू पैठणी व अन्य खेळ घेण्यात आले. त्यामुळे माहेरवाशिणी भारावून गेल्याचे पहावयास मिळाले. हा एक अनोखा कार्यक्रम पहिल्यांदाच कुंडेवहाळ गावात झाल्याने परिसरातील गावच्या ग्रामस्थांनी कौतुक करून असा कार्यक्रम आपल्याकडे घेण्याचा मानस व्यक्त केला आहे.

## बेपत्ता व्यक्तीला पोलिसांनी आणले नाशिकवरून परत

**पनवेल : वार्ताहर**

पाच वर्षांपूर्वी बेपत्ता म्हणून एका व्यक्तीची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आलेली होती. या व्यक्तीचा तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेऊन खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक प्रवीण पांडे व त्यांच्या पथकांनी नाशिक येथून त्याला परत नवीन पनवेल येथे आणले. त्यानंतर त्याला कुटुंबियांच्या स्वाधीन केले.

खांदेश्वर पोलीस ठाण्यात १ जानेवारी २०१६ रोजी तक्रार दाखल करण्यात आली होती. त्यानुसार अमन महादेव जाधव (वय ३९, रा. नवीन पनवेल) हा कामानिमित्त बंगलोर येथे जातो सांगून पत्नी व दोन मुलांना सोडून निघून गेला होता. या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलीस निरीक्षक (गुन्हे) गलांडे यांनी दिलेल्या सूचनांनुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडे व हवालदार सारंग, कांबळे यांनी अमन जाधवचे पॅनकार्ड, बँक अकाउंट, मोबाईल नंबर सिडीआरच्या तांत्रिक तपासद्वारे त्याच्या कामाची व वास्तव्य ठिकाणची माहिती प्राप्त केली. हा व्यक्ती वारंवार फोन नंबर बदलत व बंद चालू करत असे तसेच रहाण्याचे ठिकाण बदलत होता, परंतु पोलिसांनी तांत्रिक माहितीच्या आधारे सुमारे पाच वर्षांनंतर या व्यक्तीस नाशिक शहर आडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत हनुमाननगर येथून परत आणून त्याला पत्नी व दोन मुलांकडे ताब्यात देण्यात आले. या वेळी त्याच्या कुटुंबीयांनी खांदेश्वर पोलिसांचे आभार मानले आहेत.

## युवकाच्या उपचारासाठी मदतीचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रसायनीजवळ अपघातात गंभीर जखमी झालेल्या अनिकेत तांडेल या युवकाच्या उपचारासाठी मदतीचे आवाहन करण्यात आले आहे.

चार दिवसांपूर्वी गुळसुंदे येथील अनिकेत अनिल तांडेल (वय २६) हा कामानिमित्त पनवेलला जात होता. रसायनी फाटा पार केल्यानंतर अज्ञात वाहनाने त्याच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात अनिकेतला गंभीर इजा झाली आहे. त्याच्या डोक्याला मार लागल्याने त्याच्यावर कळंबोली येथील एमजीएम रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

अनिकेतच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. त्याचे वडील रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. मित्र परिवार, ग्रामस्थ, महिला मंडळांनी अनिकेतच्या उपचारासाठी थोड्याबहुत प्रमाणात आर्थिक मदत केली आहे, मात्र अनिकेतच्या वैद्यकीय उपचारासाठी मोठा खर्च येत आहे. त्यामुळे त्याच्या उपचारासाठी मित्र परिवाराने मदतीचे आवाहन केले आहे. अनिकेतला मदत करण्यासाठी निकेश तांडेल (७०६६२०२७५७), स्वप्नील चौलकर (७०२८८८१७६८) किंवा प्रथमेश पाटील (९२२२२२२९८८) यांच्याशी संपर्क साधावा.

## नागरिकांच्या सतर्कतेमुळे झाडाला जीवदान



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराजवळ असलेल्या एका झाडाला मंगळवारी (दि. १) सकाळी अचानकपणे आग लागली होती, परंतु तेथून जात असलेल्या डॉ. अदिती भागवत यांनी झाड पेटलेले बघून अग्निशमन बोलाविले. अग्निशमन दलाने झाडावरील आगीवर नियंत्रण मिळवल्याने त्या झाडाला जीवदान मिळाले आहे.

पंचमुखी हनुमान मंदीराजवळील भारत हॉटेलसमोर असलेल्या एका भेंडीच्या झाडाला मंगळवारी आग लागली होती. या वेळी डॉ. अदिती भागवत या तेथून जाताना त्यांनी ते झाड पेटलेले बघून तत्काळ अग्नीशमन दलाला फोन केला. दरम्यान, काही इतर सतर्क नागरिकही त्यांच्या परीने बाटलीतील पाणी ओतून आग विझवण्याचा प्रयत्न करत होते, पण आग भडकू लागली व झाड आगीच्या भक्षस्थानी पडत होते. अग्नीशमन दल वेळेवर पोहचले व त्यांनी पाण्याचे फवारे मारून आग विझवली. त्यामुळे सध्यातरी हे झाड बचावलेल्या स्थितीत असून डॉ. अदिती भागवत यांच्या सतर्कतेमुळे त्याला जीवदान मिळाले आहे.

## संपादकीय

# भविष्यवेधी अर्थसंकल्प

या अर्थसंकल्पाला भविष्यवेधी अशासाठी म्हटले पहिजे की यंदा प्रथमच रिझर्व्ह बँकेतर्फे डिजिटल चलन बाजारात आणण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच क्रिप्टो करन्सीबाबतही केंद्र सरकारने ३० टक्के कर आकारण्याचा मनसुबा जाहीर केला आहे. करचुकवेगिरीच्या प्रकरणात छापा मारल्यास संपूर्ण संपत्तीच जप्त करण्याची कायद्यात तरतूद करण्यात येईल, असेही अर्थमंत्र्यांनी जाहीर केले. ही सारी भविष्यवेधी पावलेच म्हणायला हवी.

**विकासावर विश्वास ठेवून वाटचाल करणाऱ्या सरकारचा भविष्यवेधी अर्थसंकल्प मंगळवारी संसदेत सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पामधून भविष्यातील भारताचे चित्र अत्यंत स्पष्टपणे दिसते. उज्ज्वल विकासाकडे आपल्या देशाची होणारी वाटचाल या अर्थसंकल्पामधून ठळकपणे दिसत असली तरी तूर्त विकासाच्या या वाटा नकाशावरच आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ भारतीय अर्थव्यवस्थेने अत्यंत जिकिरीत काढला. या डबघाईच्या अवस्थेतून मोदी सरकारने देशाची अर्थव्यवस्था प्रयत्नपूर्वक वर ओढून काढली. आता सारे काही सुरळीत होण्याच्या मार्गावर आहे याची लक्षणे सोमवारी जाहीर झालेल्या आर्थिक पाहणी अहवालातून स्पष्ट झाली होतीच. जीएसटीचे कलेक्शन एक लाख चाळीस हजार कोटी रुपयांइतके विक्रमी झाल्याचा आनंद सर्वांना आहेच. हे सारे निश्चितच आशादायक आहे. तथापि, वर्तमानात पाय घट्ट रोवून भविष्याकडे पाहणारे सरकारच देशाला समर्थ नेतृत्व देऊ शकते. भारताच्या सुदैवाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रामाणिक आणि विश्वासार्ह नेतृत्व भारताला लाभले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पानुसार तब्बल साडेसात लाख कोटी रुपयांहून अधिक खर्च निव्वळ पायाभूत सुविधांवर करण्यात येणार आहे. यामुळे नवे रोजगार निर्माण होण्यासाठी थेट मदत होईल. येत्या वर्षभरात पंतप्रधान आवास योजनेतंर्गत ८० लाख घरे बांधण्याची महत्त्वाकांक्षी घोषणा करण्यात आली आहे. त्याचे स्वागत केले पाहिजे तसेच माहिती तंत्रज्ञान, ॲनिमेशन, गेमिंग आदी संगणक व इंटरनेट आधारित उद्योगांवर लक्ष केंद्रित करण्यात येणार असून एकंदर ६० लाख नवे रोजगार निर्माण करण्याचे लक्ष्य केंद्र सरकारने आपल्यासमोर ठेवले आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये करदात्यांना कुठलाही दिलासा मिळाला नाही, किंबहुना करदात्यांची निराशाच झाली अशी टीका विरोधी पक्षांचे नेते करीत आहेत, पण ही टीका राजकीय हेतूने प्रेरित म्हणावी लागेल. प्राप्तीकराच्या ढाच्यामध्ये सलग सहाव्या वर्षी कुठलाही बदल करण्यात आलेला नाही हा टीकेचा मुद्दा होऊ शकत नाही. उलटपक्षी त्याबद्दल समाधानच व्यक्त केले पाहिजे. कोरोना काळाच्या परिणामांतून अनेक देश अजूनही सावरलेले नाहीत. अनेक देशांनी करांमध्ये भरमसाठ वाढ करून सरकारी तिजोरीत भर घालण्याचा मार्ग पत्करला, परंतु भारतात मात्र गेल्या दोन वर्षांमध्ये परिस्थितीचा रेटा असूनही कुठलीही करवाढ लादण्यात आली नाही. कोरोना काळामध्ये सामान्य नागरिकांवर कुठलाही बोजा नको असा पंतप्रधानांचाच आग्रह होता. त्यानुसारच कररचनेमध्ये बदल न करण्याचा निर्णय झाला असे स्पष्टीकरण अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिले आहे. अर्थसंकल्प हा नेहमीच एका वर्षासाठी असतो, परंतु यंदाच्या अर्थसंकल्पात येत्या २५ वर्षांचा रोडमॅप आखण्याचा प्रयत्न झाला आहे. म्हणूनच या अर्थसंकल्पाचे शेअर बाजाराने चांगले स्वागत केले. कोरोना विषाणूने भरपूर जखमा दिल्या असल्या तरी भारतासारखा देश गुडघे टेकून बसलेला नाही हाच संदेश यंदाच्या अर्थसंकल्पामधून सामान्य जनतेला मिळाला आहे.**

# टाकीचे घाव सोसल्यावरच कलाकार घडतो!



## खबरबात
### नितीन देशमुख

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय अटल करंडक स्पर्धेला मोठ्या प्रमाणात रसिक प्रेक्षक आणि स्पर्धकांचा प्रतिसाद मिळाला. नवोदित कलाकारांना या स्पर्धेतून काही शिकायलाही मिळाले. सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते विजय केंकरे, प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, प्रसिद्ध लेखक व अभिनेता संजय मोने यासारखे कलाकार मोठे झाले, त्यासाठी त्यांना कष्ट तर करावेच लागले पण त्याचबरोबर प्रयोग सुरू असताना आणीबाणीचा प्रसंग आल्यावर तो कसा निभावून नेला याचे किस्से सांगून त्यांनी कलाकार कसा घडतो याची जाणीव करून दिली. म्हणूनच म्हणतात ना, टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण येत नाही.

मकरंद अनासपूरे यांनी २८ वर्षापूर्वी मुंबईत येऊन पहिल्या नाटकात काम केले. त्यावेळी आपल्याला दिग्दर्शकाचे महत्व काय असते, हे कळल्याचे सांगताना अनासपूरे म्हणाले की, त्या नाटकात काही मातब्बर व मोठे नट होते. माझ्या पहिल्याच स्टडिंगला एका मातब्बर नटाने अपमान केला. मला असे वाटले की, आपण सगळे सोडून घरी जावे. पाहिल्याच वेळी इतक्या मोठ्या नटाने अपमान केल्यावर असे वाटणे साहजिक आहे. सामान उचलून घरी जावे किंवा केळी विकावी, हा विचार सुरू असताना दुपारच्या जेवणाला दिग्दर्शक माझ्याकडे आले. माझी छोटीशी भूमिका होती, त्यांनी मला दीड तास समजून सांगितले की, तू श्रेष्ठ आणि चांगलाच नट आहेस, त्यांच्याकडे लक्ष देऊ नकोस. जोपर्यंत मी म्हणत नाही तोपर्यंत तुला या नाटकातून कोणीही काढू शकत नाही. अपमान केला तर सहन कर. कारण ही तुझी सुरुवात आहे. नाटकाच्या पहिल्याच सादरीकरणाला माझ्या एन्ट्रीला टाळ्या आल्यानंतर त्या मान्यवर नटाने जिन्या खालच्या अंधारात माझी माफी मागितली. जर सर (विजय केंकरे) नसते तर कदाचित मी कोठे तरी केळी विकत असतो.

अंधार यात्री एकांकिका स्मशानात रहाणाऱ्या लोकांवर होती. त्यात मकरंद अनासपुरेची बापाची तर मंगेशची मुलाची भूमिका होती. बापाचे आणि मुलाचे भांडण होते. मुलाला त्या परंपरेत राहायचे नाही. त्याला शहरात जाऊन काही तरी करायचे आहे. तो बंड करून बापाशी भांडून शहरात जातो. त्याला काम मिळाल्यावर तो वडिलांना सांगायला येतो. वडील वारलेले आहेत. तो बसून चिता पेटवतो आणि त्या चितेच्या प्रकाशात त्याचे शेवटचे स्वगत आणि प्रकाशाच्या दिशेने वाटचाल असे दृश्य असते. चिता स्टेजवर पेटवायची होती. त्यासाठी आमचा एक मित्र बसवला होता. त्याला रॉकेलच्या बोळ्याचा स्टँड दिला होता. मंगेशने फक्त माचिस पेटवायची आणि ती एका बोळ्याला लावायची, ते पेटत जाणार आणि सगळीकडे अंधार चिता पेटलेली आणि त्याचे स्वगत. पण सीन सुरू झाला, त्यावेळी मागे बसलेला शिव्या देत होता. त्यामुळे माझ्या लक्षात आले की, चिता पेटलेलीच नाही. तेव्हा मला कळलं की काही तरी घोळ झाला आहे. मात्र मी मेलेला असल्याने मानही वळवून बघू शकत नव्हतो. मी एक डोळा किलकिला करून पहिले तर वरचा लाईट चालू. म्हटलं घडलं काहीतरी. सीन संपला. पडदा पडल्यापडल्या लगेच स्टेजवर भांडण. काय नालायक आहेस. एक माचिस पेटवायची, तेवढं नाही जमल. मंगेश म्हणाला माचिसमध्ये एकच काडी पेटवताना गूल तुटलं ना. आता गूल शोधू का, संवाद बोलू. तेव्हापासून सिगारेट पिणारे मित्र कोणत्याही प्रयोगाला बोलवायचे नाहीत, असे ठरवून टाकले.

संजय मोने यांनीही त्यांच्यावर ओढवलेला प्रसंग सांगितला. परळला नरे पार्कमध्ये आमच्या नाटकाचा प्रयोग होता. एका नटाला तारीख दिली नव्हती. तो ठाण्याला राहायचा. त्यावेळी मोबाईल नव्हते. त्याला घरी फोन केला. त्याच्या आईने सांगितले, तो नाटकाच्या चर्चेसाठी गेला आहे. मग तिथे फोन केला. त्याला ताबडतोब येण्यास सांगितले. तो निघाला. तो येईपर्यंत वेळ जाणार. दोन अंकी नाटक संपायला उशीर होणार. पहिल्या अंकाच्या सुरुवातीलाच त्याचा प्रवेश होता. बाकीचे कलाकार लांबून आलेले, त्यांना रात्री जायला उशीर होणार म्हणून मी सांगितले की, आपण दूसरा अंक पहिला करू या. माझ्या बरोबरची एक कलाकार म्हणाली, असे कसे. मी तिला सांगितले. दूसऱ्या अंकातले वाक्य तू कधी बोलतेस. आल्या बरोबर एक चहा आणि संपल्यावर एक चहा पितेस. म्हणजे दोन चहा घेतल्या नंतर जी वाक्य बोलायची आहेत, ती आज एक चहा घेतल्यानंतर बोलायची. आम्ही दूसरा अंक केला. त्यामध्ये एका माणसाचा खून होतो आणि त्याचा तपास. मग पहिला अंक सुरू केला. या खुनातील काही प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत म्हणून आपण पुन्हा एकदा पहिल्यापासून करू या, म्हणत दूसरा अंक केला. कोणालाही काहीही कळले नाही.

यावेळी मराठीचा वापर कसा करावा, याबाबतही संजय मोने आणि विजय केंकरे यांनी लेखक आणि दिग्दर्शकांची शाळा घेतली. बँकेत जाण्यासाठी सोबत लागत नाही. हल्ली एकांकिकेत सोबत हा शब्द वारंवार मराठी बातम्या बघितल्यामुळे येतो. तू माझ्या सोबत चल. श्रीखंडा बरोबर भाकरी खायची नसते. बँकेत सोबत नसते, जिथे भीती असते किंवा साथ असते तिथे सोबत असते. बँकेत माझ्या बरोबर चल, बँकेत मला दोन लाख रुपये भरायचे आहेत. माझ्या सोबत चल एवढाच फरक असतो. तो कळत नाही, कोणी सांगणार नाही. तो जरा बघा. माझी मदत म्हणतात मालिकांमध्ये बघून, तसे नव्हे मला मदत आहे. करुयात, जावूयात, बोलूयात , राहूयात असा 'त' नसतो. 'त' वरुन ताक भात ओळखायचा असतो तरी असा 'त' नसतो कधी. राहू या ,जावू या, बोलू या, एवढे जरा बघा, असे संजय मोने यांनी सांगितले.

विजय केंकरे यांनी, आपण एनसीपीएमध्ये नोकरी करीत असताना बॉस पु. ल. देशपांडे होते. त्यांनी एका पाटील नावाच्या गृहस्थाना १० वाजता एक फाईल आणायला सांगितली होती, ते ११ वाजता घेऊन आले. भाईंनी त्यांना विचारले काय रे, उशीर का झाला? ते म्हणाले मी कामात व्यस्त होतो, म्हणून मला ती फाईल आणून देता आली नाही. तो गृहस्थ बाहेर पडताना भाई त्याला म्हणाले– अरे, पुढची फाईल मी तुला आणायला सांगितली आहे, ती तू सम प्रमाणात असशील तेव्हा घेऊन ये. त्यामूळे लक्षात ठेवा मराठी भाषेत माणूस कामात व्यग्र असतो व्यस्त नाही. व्यस्त हे गणिताचे प्रमाण आहे. भाषा हा फार महत्वाचा भाग आहे म्हणून आपण त्याकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

(छाया : संजय करडे)



# मुरूडमध्ये जंजिरा मुक्ती संग्राम दिन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लब व तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मुरूडमध्ये सोमवारी (दि. ३१) जंजिरा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. सकाळी शहरातील आझाद चौकात नगर परिषदेचे प्रशासक पंकज भुसे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मेघराज जाधव यांनी जंजिरा मुक्ती संग्रामविषयी माहिती दिली.

मुरूडचे पोलीस निरीक्षक नितीन गवारे, नायब तहसीलदार गोविंद कौटुंबे, माजी तहसीलदार नयन कर्णिक, माजी पाणी पुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, नगरसेवक प्रमोद भायदे, योगिता ठाकूर, अजित कारभारी, श्रीकांत सुर्वे, सुनील शेळके, एकदरा सरपंच रामकृष्ण आगरकर, प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष भारत रांजणकर, तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष सिराज शेख, सचिव सुधीर नाझरे, सहसचिव नितीन शेडगे, खजिनदार गणेश चोडणेकर, प्रकाश सादरे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी अध्यक्ष संजय करडे यांनी आभार मानले.

# अखेर खोपोली पालिका प्रशासनाला आली जाग!

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील अनेक मोक्याच्या ठिकाणी जागा अडवून व्यवसाय करणाऱ्या हातगाडीवाल्यांविरोधात खोपोली पालिकेने पोलीस बंदोबस्तात मोहीम उघडली तरी कायद्याचा धाक नसल्याने ही कारवाई 'फुसका बार' ठरत आहे.



(छाया : विनायक पाडये)

शहराच्या मुख्य बाजारपेठेत आर. डी. कॉम्प्लेक्ससमोर, त्याचप्रमाणे दीपक चौकात मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे फळ आणि भाज्यांच्या हातगाड्या लावून व्यवसाय केला जातो. काही ग्राहक हातगाडी शेजारीच गाडी उभी करून खरेदी करतात, त्यामुळे अनेकदा या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. रेल्वे स्टेशनला जाणारा हा मुख्य रस्ता तत्कालीन मुख्याधिकारी संजय शिंदे यांनी फेरीवाला मुक्त केला होता. पण या रस्त्यावर सायंकाळी पाचनंतर मोठ्या प्रमाणात हातगाड्या दिसून येतात. पूर्वीच्या मुख्याधिकाऱ्यांनी यावर लक्ष ठेवण्यासाठी माणसांची नेमणूक केली होती, परंतु अधिकारी बदलले की, पहिले नियम गुंडाळे जातात हा खोपोलीकरांचा नेहमीचा अनुभव आहे. दिवसेंदिवस हातगाडीवाल्याची संख्या वाढतच आहे. पण यावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणाच नाही.

काही वर्षांपूर्वी मुंबईच्या धर्तीवर हातगाडीवाल्यांना लायसेन्स देण्याविषयी पालिका वर्तुळात चर्चा झाली होती. मात्र त्यानंतर चर्चा झालीच नाही किंबहुना लोकप्रतिनिधींनीही त्यावर चर्चा घडवून आणलीच नाही. खोपोलीत सध्या अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे हा मुद्दा ऐरणीवर आला आहे. याबाबत स्थानिक प्रसारमाध्यमांनी जोरदार आवाज उठविला पण पालिका प्रशासन धृतराष्ट्राच्या भूमिकेत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

शहरातील विकसित होणाऱ्या डीपी रोड (लवजी, चिंचवली) भागात तर अनेक विकासकांनी मनमानी करित बांधकामे केली आहेत. अनेक ठिकाणी रस्त्याचा भागच गिळंकृत केल्याचे खालापूर जर्नलिस्ट असोसिएशने निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले पण चौकशी सुरू आहे, बघतो या पलीकडे अधिकाऱ्यांकडून दुसरे कुठलेच ठाम उत्तर मिळत नसल्याचा आरटीआय कार्यकर्ता तसेच पत्रकारांचा आरोप आहे. अशा परिस्थितीत कर भरणारे नागरिक मात्र हवालदिल झाले आहेत.

## आरोग्य प्रहर

# मुलांच्या आहारात ब्रोकलीचा समावेश केल्यास बरेच फायदे

जर तुम्ही मुलांसाठी हेल्दी पदार्थ बघत असाल तर ब्रोकोलीची रेसिपी अत्यंत उपयुक्त ठरते. ब्रोकोलीचा समावेश पौष्टिक भाज्यांच्या श्रेणीत होते. ब्रोकोलीमध्ये माइक्रोन्यूट्रिएंटस आणि फाइटोकेमिकल असतात. ही दोन्ही तत्व बाळाला स्वस्थ ठेवण्यासाठी मदत करतात. त्यामुळे मुलांच्या आहारात ब्रोकलीचा समावेश नक्की करा. जेणेकरून तुमचे मुल स्वस्थ, गुबगुबीत होईल आणि मुलाची उंची वाढण्यासही मदत होईल.

ब्रोकोलीचा पौष्टीक भाज्यांच्या श्रेणीत होते. मोठी माणसे नव्हे तर लहान मुलांनाही ब्रोकोली आवडते. सूप, भाजी आणि भातामध्ये ब्रोकोली वापरता येते. यामध्ये माइक्रोन्यूट्रिएंटस



आणि फाइटोकेमिकल असतात. ही दोन्ही तत्व बाळाला स्वस्थ ठेवण्यासाठी मदत करतात. त्यामुळे मुलांच्या आहारात ब्रोकलीचा समावेश नक्की करा. या लेखाच्या माध्यमातून ब्रोकोली राईस बनवण्याची रेसिपी शेअर करतोय. सोबतच ब्रोकोलीचे फायदे समजून घ्या. राष्ट्रीय आरोग्य सेवेनुसार बाळ सहा महिन्याचे झाल्यानंतर त्यांना ब्रोकोली खाऊ घालता येते. सुरुवातीला ब्रोकोलीची प्यूरी करा किंवा उकळलेली ब्रोकोली मँश करून खाऊ घाला. नंतर हळूहळू ब्रोकोलीला दुसऱ्या भाज्यांसोबत ब्लेंड करून घ्या. नऊ महिन्यांनंतर बाळ ब्रोकोलीचे छोटे-छोटे तुकडे खाऊ शकतात. ब्रोकोली माइक्रोन्यूट्रिएंटसचा स्रोत असल्याने यामध्ये के, बी ६, बी ९, बी २, सी जीवनसत्त्वे असतात. ४५ ग्रँम कच्ची ब्रोकोली बाळाचा दररोज आवश्यक असणारे पोषणाची गरज पूर्ण करू शकते.

**इम्युनिटी वाढवते :** ब्रोकोलीतील अँन्टी-इफ्लामेंट्री, अन्टीकॉक्सिड आणि कार्डियोप्रोटेक्टिव्ह गुण असतात. यामध्ये सिलेनियम आणि व्हिटॅमिन सी आणि फाइटोकेमिकल असतात. ही सर्व तत्व हळूहळू इम्युनिटी म्हणजे प्रतिकारशक्ती वाढवतात. ब्रोकोलीमध्ये व्हिटॅमिन सी असते. यामुळे शरीरात कोलाजन तयार होण्यास मदत होते. यामुळे धमन्या, शरीर आणि त्वचेला सपोर्ट मिळतो.

**हाडांना करते मजबूत :** कच्च्या ब्रोकोलीमध्ये २१.२ मिलीग्रँम कॅल्शियम, ९.४५ मिलिग्रँम मॅग्नेशिअम, २९.७ मिलीग्रँम फॉस्फरस आणि १४२ मिलीग्रँम पोटॅशियम असते. ही पोषक तत्व हाडांना मजबूत करतात.

**टीप–** सगळ्यांच मुलांना ब्रोकोली राईस द्यायलाच हवा, असा काही नियम नाही. अधिक माहितीसाठी नेहमीच आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यायला विसरुन नका. काही वेळेस ॲलर्जी झाल्यास वेळीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# सुधागड तालुकास्तरीय स्पर्धांमध्ये नेणवली शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश

(छाया : धम्मशील सावंत)



**पाली : प्रतिनिधी**

राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधून सुधागड तहसील कार्यालय आणि शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धा व उपक्रम घेण्यात आले होते. त्यात नेणवली येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी भरघोस पारितोषिके पटकावली.

मतदार दिनाचे औचित्य साधून तहसीलदार दिलीप रायण्णावार व गटशिक्षणाधिकारी शिल्पा दास यांच्या मार्गदर्शनाखाली पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यातील निबंध, चित्रकला व रांगोळी स्पर्धेत नेणवली प्राथमिक शाळेच्या साक्षी कृष्णा खराडे हिने प्रथम क्रमांक पटकावला. तर आर्या किरण मगर हिने निबंध व रांगोळी स्पर्धेत द्वितीय आणि ओमकार प्रकाश वाघमारे याने निबंध स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धांचा बक्षीस समारंभ नुकताच पाली येथील ग. बा. वडेर हायस्कूलमध्ये झाला. या वेळी तहसीलदार दिलीप रायण्णावार, नायब तहसीलदार वैशाली काकडे, प्राचार्या डॉ. अंजली पुराणिक, गटशिक्षणाधिकारी शिल्पा दास, पर्यवेक्षक एस. एस. पायानी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सर्व शिक्षक, नवमतदार व स्पर्धक विद्यार्थी उपस्थित होते.

# कर्जत ज्येष्ठ नागरिक संस्थेस मिळाले कार्यालय

**कर्जत : प्रतिनिधी**

येथील ज्येष्ठ नागरिक संस्थेस कर्जत नगर परिषदेने कार्यालय उपलब्ध करून दिले आहे. नुकताच त्याचा हस्तांतर सोहळा उत्साहात झाला.



(छाया : विजय मांडे)

आपल्या संस्थेला कार्यालय मिळावे, अशी मागणी कर्जत ज्येष्ठ नागरिक संस्थेने नगर परिषदेने केली होती. त्यानुसार नगर परिषदेन मुद्रे नानामास्तरनगर तेथील व्यायाम शाळेवर ज्येष्ठ नागरिक संस्थेला कार्यालय उपलब्ध करून दिले आहे. त्याचा हस्तांतर समारंभ नुकताच नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते संपन्न झाला. या वेळी नगरसेविका भारती पालकर, संचिता पाटील, वैशाली मोरे, प्राची डेरवणकर, नगरसेवक राहुल डाळींबकर, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष सुभाषचंद्र नातू, माजी अध्यक्ष मोरेश्वर शहासने, मुकुंद मित्रगोत्री, अच्युत कोडगिरे, प्राजक्ता गरवारे आदींसह ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# हळदी-कुंकू समारंभात कोरोनाचे वाण

## ▪ पेणमधील प्रकार, आयोजकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पेण : रामप्रहर वृत्त**

कोरोना ससंर्गामुळे राज्य शासनाने सार्वजनिक कार्यक्रमांवर बंधने घातली आहेत. असे असतानाही पेणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने भरविलेल्या हळदी-कुंकू समारंभात नियम पायदळी तुडविण्यात आले आहेत. या प्रकरणी आयोजकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांकडून होत आहे.

पेण शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने झालेल्या या हळदी-कुंकू कार्यक्रमात चटई वाटप आणि होम मिनिस्टरसारखे स्पर्धात्मक कार्यक्रम असल्याने दीड ते दोन हजार महिलांनी सहभाग घेतला होता. त्यामुळे शासनाच्या कोरोना नियमावलीचे सर्रास उल्लंघन झाल्याचे पहावयास मिळाले. विशेष म्हणजे लोकप्रतिनिधी आमदार अनिकेत तटकरे यांच्या उपस्थितीतच हा कार्यक्रम झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या कार्यक्रमास आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह वेदांती तटकरे, जिल्हा महिला अध्यक्ष गीता पालेरचा, लीना बाफना, नगरसेविका वसुधा पाटील, सरपंच रश्मी भगत, मंजुळा घासे, संतोष श्रृंगारपुरे, यशवंत घासे, नरेंद्र ठाकूर, दयानंद भगत, जितू ठाकूर, विशाल बाफना आदी पदाधिकारी उपस्थित होते. एकीकडे राज्य सरकार कोरोनाचे नियम पाळा, असे आवाहन करीत असताना दुसरीकडे मात्र राष्ट्रवादीचे नेते व पदाधिकारी सरकारच्या आवाहनाला हरताळ फासून कोरोना फैलावण्यास मदत करीत असल्याचे दिसून आले.

या हळदी-कुंकू कार्यक्रमात झालेली गर्दी पाहता पोलिसांनी आयोजकांना चटई वाटप बंद करण्याची सूचना दोन वेळा केली, मात्र पोलिसांच्या सूचनेकडे आयोजकांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे कोरोना नियमांचे आणि पोलिसांच्या सूचनेचे उल्लंघन झाल्याने कार्यक्रम घेणाऱ्या आयोजकांवर कारवाई होणार का, असा सवाल नागरिकांमधून विचारला जात आहे.



### महिलांची चेंगराचेंगरी

*या वेळी महिलांना सौभाग्याचे वाण म्हणून चटईचे वाटप करण्यात येणार असल्याने महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता, मात्र नियोजनाच्या अभावामुळे कार्यक्रमात अक्षरशः चेंगराचेंगरी झाली. त्याचबरोबर अनेक महिलांना चटईसाठी ताटकळत बसावे लागले, तर काहींना चटई न मिळाल्याने त्यांचा हिरमोड होऊन त्या अखेर कार्यक्रमातून निघून गेल्या.*

> निवडणुका आल्या की असे कार्यक्रम सुरू होतात, मात्र एवढी गर्दी करून कोरोनाला निमंत्रण देण्यासारखेच आहे. त्यामुळे आयोजकांवर गुन्हा दाखल झाला पाहिजे. नाही तर सामान्यांना एक न्याय आणि राजकीय कार्यक्रमाच्या आयोजकांना दुसरा असे म्हणावे लागेल.
>
> -हरीश बेकावडे, सामाजिक कार्यकर्ते

# 'मविआ' सरकारने रायगडातील मच्छीमारांच्या तोंडाला पुसली पाने

## डिझेल परतावा रक्कम कमी मिळाल्याने सोसायट्यांची नाराजी

**मुरुड : प्रतिनिधी**

डिझेल परताव्याची ४८ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम थकीत असताना फक्त दोन कोटी देण्याचे परिपत्रक काढून राज्य सरकारने रायगड जिल्ह्यातील मच्छिमार सोसायट्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत. त्यामुळे मच्छिमार संस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. राज्य शासनाने रायगड जिल्ह्यासाठी परतावा रक्कम मोठ्या स्वरूपात द्यावी; अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी दिला आहे.

मच्छिमारी करणाऱ्या होड्यांना मच्छिमार सोसायटीमधून माफक दरात डिझेल पुरवठा केला जातो. त्यासाठी राज्य शासनाकडून मच्छिमार सोसायट्यांना डिझेल परतावा दिला जातो. मुरूड तालुक्यात १५ तर रायगड जिल्ह्यात ६०पेक्षा जास्त मच्छिमार सोसायट्या कार्यरत आहेत, मात्र काही अपवाद वगळता त्यांना २०१७पासून डिझेल परताव्याची रक्कम मिळालेली नाही. या मच्छिमार संस्थांनी डिझेल परताव्याचे प्रस्ताव सहाय्यक मत्स्यविकास अधिकाऱ्यांकडे सादर केले आहेत. मात्र डिझेल परतावा न मिळाल्यामुळे मच्छिमार संस्था मेटाकुटीला आल्या आहेत. डिझेल परतावा मिळण्यासाठी त्यांनी अनेकदा राज्य शासनाकडे अर्ज विनंत्या केल्या आहेत.

दरम्यान, शासनाच्या कृषी व पशुसंवर्धन दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभागाने २८ जानेवारी २०२२ रोजी काढलेल्या परिपत्रकात रायगड जिल्ह्यातील मच्छिमार संस्थांना डिझेल परतावा रक्कम देण्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ४८ कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम थकीत असताना फक्त दोन कोटी देऊ केल्याने जिल्ह्यातील मच्छिमार संस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. राज्य शासनाने तुटपुंजी रक्कम देऊन आमची बोळवण केली असल्याची प्रतिक्रिया मच्छिमारांनी व्यक्त करीत आहेत.

> **जिल्ह्यात एकूण ६० मच्छिमार संस्था असून त्यांना २०१७पासूनची डिझेल परतावा मिळलेला नाही. त्यासाठी किमान ४६ कोटी रुपये आवश्यक आहेत, मात्र २८ जानेवारीच्या परिपत्रकान्वये राज्य शासनाने रायगड जिल्ह्यास फक्त दोन कोटी रुपये देऊन आमच्या तोंडाला पाने पुसली आहेत. रायगड जिल्ह्यासाठी परतावा रक्कम मोठ्या स्वरूपात द्यावी; अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल.**
>
> **-मनोहर बैले, उपाध्यक्ष, रायगड जिल्हा मच्छिमार संघ**

# माणगावमध्ये महिलेला मारहाण

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील घोडशेतवाडी येथे रविवारी (दि. ३०) रात्री एका महिलेला मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा ३० जानेवारी २०२२ रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास माणगाव तालुक्यातील घोडशेतवाडी येथे फिर्यादी यांच्या घरासमोर घडला. याबाबतची फिर्याद कमल बाळाराम शिंदे (वय-६२) रा.घोडशेतवाडी ता.माणगाव यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली. फिर्यादी कमल बाळाराम शिंदे या रविवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास त्यांच्या अंगणात भांडी धुवत होत्या. त्यावेळी आरोपी रामचंद्र गंगाराम खुटवळ (रा. घोडशेतवाडी, ता. माणगाव) याने काही कारण नसताना फिर्यादी महिलेला शिवीगाळ आणि बांबूच्या काठीने मारहाण केली. तसेच जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक फौजदार श्री. भोजकर करीत आहेत.

# खोपोली सुभाषनगर रस्त्याच्या नामकरणासाठी ग्रामस्थ आक्रमक

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मास्को गेट ते सुभाषनगर या मार्गाला तसेच चौकाला स्वर्गीय सखाराम जाधव यांचे नाव द्यावे, अशी मागणी सुभाषनगर येथील ग्रामस्थांनी यापूर्वी निवेदनाद्वारे केली होती. त्यापैकी रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम पूर्ण झाले, त्याबद्दल ग्रामस्थांनी पालिका प्रशासनाचे आभार मानले पण नामकरणाचा मुद्दा अनिर्णित होता. त्याबाबत खोपोली पालिका प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपचे सोशल मीडिया सेल कार्यकर्ते व ग्रामस्थ राहुल जाधव यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकारी अनुप दूरे यांच्याकडे केली आहे. याबाबतचे निवेदन स्वीकारून कार्यवाही करू असे आश्वासन मुख्याधिकारी दूरे यांनी शिष्टमंडळाला दिले आहे. या शिष्टमंडळात फरीद शेख, किशोर पुजारी, समीर गायकवाड, के. कांबळे, गोपाळ बावस्कर इत्यादीचा समावेश होता.



ग्रामस्थांनी खोपोली नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

मस्को गेट ते सुभाषनगरपर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करावे तसेच या रस्त्याला माजी उपनगराध्यक्ष सखाराम जाधव यांचे नाव देण्यात यावे. अशी मागणी खोपोली नगरपालिका हद्दीतील सुभाषनगर

# 'त्या' आरोपीचा अलिबाग कारागृहातूनही पळण्याचा प्रयत्न

## पोलिसांनी १० मिनिटांत केली अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेण पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळालेला आरोपी बिरू महातो याने सोमवारी (दि. ३१) सध्याकाळी अलिबाग जिल्हा कारागृहाच्या ३५ फूट दगडी तटबंदीवरून पळून जाण्याचा पुन्हा प्रयत्न केला. पोलिसांनी त्याला दहा मिनिटात अटक केली. मात्र दगडी भिंतीवरून उडी मारल्याने त्याचा पाय फ्रॅक्चर झाला आहे. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हाफ मर्डर गुन्ह्यात बिरू महातो पेण पोलीस ठाण्यातील कोठडीत अटक होता. ३० जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी बिरू याला शौचालयाला बाहेर काढले. यावेळी बिरूने बाजूच्या भिंतीवरून पलायन केले. त्यानंतर बारा तासाने आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले होते. त्याची पोलीस कोठडी संपल्याने ३१ जानेवारी रोजी पेण न्यायालयात हजर केले. न्यायालयीन कोठडी सुनावल्याने बिरू महातोला सोमवारी सायंकाळी सात वाजता अलिबाग येथील जिल्हा कारागृहात आणले होते. त्यावेळी कारागृह अंमलदाराला धक्का देऊन बिरूने कारागृहाच्या ३५ फूट उंच दगडी तटबंदीवरून उडी मारून पलायन केले. अलिबाग पोलिसांनी कारागृहालगतच्या परिसराची झाडाझडती सुरु करण्यात आली. दहा मिनिटातच एका घरामागील सरपण ठेवण्याच्या जागेत तो लपलेला आढळून आला.

या प्रकरणी अलिबाग पोलीस ठाण्यात आरोपी बिरू महतो याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शैलेश सणस करत आहेत.

# दंड न भरणाऱ्या वाहनचालकावर आता दाखल होणार खटला

**अलिबाग : प्रतिनिधी**

वाहतुकीचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करण्यात अलेल्यांकडून तीन कोटी ७९ लाख ९३ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल झालेला नाही. त्यामुळे दंड न भरणाऱ्यांवर न्यायालयात खटले दाखल करण्याचा निर्णय रायगड पोलीस दलाच्या वाहतूक शाखेने घेतला आहे.

वाहतूक नियमांचे उल्लघन करणाऱ्यांकडून दंड वसूलीत पारर्दशता यावी म्हणून ई चलन प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. मात्र या प्रणालीमुळे दंडाची रक्कम थकवण्याचे प्रमाण वाढले आहे. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करून रायगड जिल्ह्यात गेल्या वर्षभरात सव्वा चार कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. मात्र यापैकी ५० लाख रुपयांचा दंड प्रत्यक्ष जमा झाला आहे. तीन कोटी ७९ लाख ९३ हजार ६०० रुपयांचा दंड वसूल झालेला नाही.

रायगड जिल्ह्यात २०२१ या वर्षात एक लाख ५३ हजार ३८७ जणांना वाहतूक नियम मोडल्याप्रकरणी चलन जारी करण्यात आले आहे. त्यांच्याकडून चार कोटी ३० लाख ३० हजार रुपयांचा दंड वसूल होणे अपेक्षित होते. यापैकी २० हजार ३३१ जणांनी ५० लाख ३७ हजार १०० रुपयांचा दंड प्रत्यक्ष भरला आहे. तर एक लाख ३२ हजार ८५९ जणांनी तीन कोटी ७९ लाख ९३ हजार ६०० रुपयांचा दंड भरलेलाच नाही. त्यामुळे आता या थकीत दंडाची वसूली करण्याचे मोठे आव्हान वाहतूक पोलिसांसमोर उभे राहिले आहे.

दंडाची रक्कम न भरल्यास सातव्या दिवशी प्रकरण पुढील कारवाईसाठी न्यायालयात दाखल करण्याचा निर्णय वाहतूक पोलिसांनी घेतला आहे. लोकन्यायालयातही या प्रकरणांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने पोलिसांनी तयारी सुरु केली आहे. आत्तापर्यंत १९७ प्रकरणे न्यायालयात दाखलही करण्यात आली आहेत.

> **पुरेशी संधी देऊनही दंडाची रक्कम भरण्याकडे वाहन चालक दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे आता आम्ही ही सर्व प्रकरणे न्यायालयात दाखल करणार आहोत.**
>
> **-राजेंद्र पाटील, वाहतूक पोलीस निरीक्षक, रायगड**

# समरभूमी उंबरखिंड येथे आज विजय दिन सोहळा

**खालापूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील चावणी ग्रामपंचायत, ग्रामस्थ, खालापूर पंचायत समिती आणि शिवदुर्ग मित्र-लोणावळा यांच्या माध्यमातून समरभूमी उबरखिंड येथे बुधावारी (दि. २) सकाळी ९.३० वाजता ३६१वा विजय दिन सोहळा आयोजिण्यात आला आहे. या वेळी शिवशाहीर वैभव घरत हे पोवाडा आणि गीतांचा कार्यक्रम सादर करणार आहेत.


**ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद**

**ता. पनवेल, जि. रायगड**

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जानेवारी २०२२**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सहदेव बापू कुपेरकर सोनम सहदेव कुपेरकर | उन्मेश रघुनाथ पारकर | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, बिल्डींग नं. ३, सिद्धी को.ऑप.हौ. सो.लि. पालीदेवद | पवल-१-४३९४-२०१७ | १४/०६/२०१७ |
| २ | कविता गोपाळ शिंदे | मे.न्यू. बजेट होम बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे शशिकांत चौधरी | सदनिका क्र. २०७, दुसरा मजला, अंजनी कॉम्प्लेक्स, बी विंग, हाउस नं. ३१५, शिलोत्तर रायचूर | पवल-३-७८५१-२०१३ | २५/१०/२०१३ |
| ३ | मशवा यल्लप्पा कुंचिकुरवे | मयुरा बिल्डर्स | सदनिका क्र. २, तळ मजला, साईनाथ बिल्डींग, टाईप अे/३ प्लॉट नं. १,२,३ गट ५०/अ पालीदेवद | पवल-१-१६१५-१९९५ | १७/०४/१९९५ |
| ४ | श्रीकांत अनिल सरोज | भाई कृष्णा कोचरेकर सुचित्रा भाई कोचरेकर | सदनिका क्र. डी.२०४, डी विंग, दुसरा मजला, साक्षी पार्क-४ को. ऑप.हौ. सोसायटी लि., तेरणा गार्डनजवळ, पालीदेवद | पवल-२-७३५०-२०२१ | २१/०५/२०२१ |
| ५ | रूपाली उदय शिंदे | मे.एन.सी. डेव्हलपर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | सदनिका क्र. ००६, तळ मजला, सद्‌गुरु रेसिडन्सी, सर्व्हे नं. १२/ए/प्र/ए/३, मौजे शिलोत्तर, रायचूर | पवल-३-३५३७-२०२१ | १८/०२/२०२१ |
| ६ | सुनिता अंबादास दोन्ता उर्फ सुनिता आनंद दसरी | मे. स्वामी समर्थ बिल्डर्स आणि डेव्हलपर्स तर्फे भागीदारी योगेश सुधाकर सवळेकर व नीला दिगंबर गडकरी | सदनिका नं. २०३, दुसरा मजला, शुभारंभ घर नं. ८७/१३/२०३, प्लॉट नं. १६, मौजे पालीदेवद | पवल-३-९९२६-२०२१ | २३/०६/२०२१ |
| ७ | उदय रामदास चव्हाण तृप्ती उदय चव्हाण | धोंडू गणू जुवाटकर | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, बि.नं.जी-५, श्री निकेतन को.ऑप. हौ.सो.लि. प्लॉट नं. ०३, शिलोत्तर रायचूर | पवल-२-१८१७३-२०२१ | २८/१२/२०२१ |
| ८ | जयेश मारूती पाखरे नलिनी जयेश पाखरे | मे. श्री. नामदेव इंटरप्रायझेस तर्फे प्रोप्रा नेहा नरेंद्र धाडवे | सदनिका क्र. २०१, दुसरा मजला, बी विंग, प्रयाग आंगण, प्लॉट नं. १,२,३,४,५,६ मौजे शिलोत्तर रायचूर | पवल-४-१२००४-२०१५ | २४/०९/२०१५ |
| ९ | प्रवीण गुगा मगदुम अमृता प्रविण मगदुम | जयेश धर्मण नाबीयार | सदनिका क्र.२-४, दुसरा मजला, बि.नं. ३/४, वृंदावन रेसिडेन्सीयल कॉम्प्लेक्स, फेज-१, अजिंक्यतारा को.ऑप.हौ.लि., सर्व्हे नं. १९ सी.२ पालीदेवद | पवल-४-३९-२०२२ | ०३/०१/२०२२ |
| १० | स्नेहल संतोष सावंत तर्फे कु.मु. म्हणून संतोष पांडुरंग सावंत | राजेंद्र अवदेश उपाध्याय शिवकुमारी अवदेश उपाध्याय | सदनिका क्र. बी २०२, दुसरा मजला, बी विंग, ब्ल्यू हेवन को.ऑप.हौ. सो.लि. सर्व्हे क्र. २२, मौजे पालीदेवद | पवल-३-१००९२-२०२१ | २८/०६/२०२२ |
| ११ | किसन हिरू जाधव | विजय मोहन गुप्ता | सदनिका क्र. ०३, तळ मजला, रचना को.ऑप.हौ.सो.लि., सर्व्हे क्र. १६, प्लॉट नं. १, घर मिळकत नं. २१६/३, मौजे पालीदेवद | पवल-२-२१२-२०२२ | ०६/०१/२०२२ |
| १२ | जागृती अजित पवार | विवेक सुदाम पारंगे | सदनिका क्र. ४, बि.नं.जी-८, तळ मजला, यमुना को.ऑप.हौ. सो.लि., हिस्सा नं. ३, मौजे पालीदेवद शि. रायचूर | पवल-३-८९०१-२०१९ | २८/०५/२०१९ |
| १३ | प्रविण पोपट खंडागळे | पोपट लक्ष्मण खंडागळे | सदनिका क्र. जी १/१६, बी विंग, दुसरा मजला, सर्वादय को.ऑप.हौ. सो.लि. शि. रायचूर | पवल-४-७१५०-२०२१ | १३/०७/२०२१ |
| १४ | शैलेश चंद्रकांत वनगे चंद्रकांत रामचंद्र वनगे | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स घर क्र. ५८२/३/१०३ | सदनिका क्र. १०३, पहिला मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-९४९-२०२२ | २१/०१/२०२२ |
| १५ | शैलेश चंद्रकांत वनगे चंद्रकांत रामचंद्र वनगे | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. १०४, पहिला मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-९४८-२०२२ | २१/०१/२०२२ |
| १६ | महादेव गोऱ्या भुनेसर | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. १०६, पहिला मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-११४३-२०२२ | २५/०१/२०२२ |
| १७ | प्रियांका विशाल वाघ विशाल राधाकिसन वाघ | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. २०१, दुसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-११३९५-२०२१ | २३/०८/२०२१ |
| १८ | देवेंद्र देविदास पाटील सुविज्ञा देवेंद्र पाटील | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. २०२, दुसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-८५४६-२०२१ | २५/०६/२०२१ |
| १९ | संजिवनी दीपक म्हात्रे दीपक हरिभाऊ म्हात्रे | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-१७५९७-२०२१ | २०/१२/२०२१ |
| २० | संजिवनी दीपक म्हात्रे दीपक हरिभाऊ म्हात्रे | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-१७६१४-२०२१ | २०/१२/२०२१ |
| २१ | वैशाली संतोष वेटकोळी संतोष दत्तात्रेय वेटकोळी | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. २०५, दुसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-३५९८-२०२१ | २६/०२/२०२१ |
| २२ | संपत्ती दीपक जाधव दीपक कृष्णा जाधव | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. २०६, दुसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-१००५९-२०२१ | २६/०७/२०२१ |
| २३ | चित्रा यशवंत मोकल यशवंत जगदीश मोकल | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ३०१, तिसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-७१६१-२०२१ | १२/०५/२०२१ |
| २४ | शिखा रतन भोवल रतन रामकृष्ण भोवल | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ३०२, तिसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-८५५६-२०२१ | २५/०६/२०२१ |
| २५ | रतन रामकृष्ण भोवल | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ३०३, तिसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-८५५७-२०२१ | २५/०६/२०२१ |
| २६ | मनिषा निखिल पाटील निखिल रोहिदास पाटील | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ३०५, तिसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-१००६२-२०२१ | २६/०७/२०२१ |
| २७ | राजेंद्र नाना जोशी शीतल राजेंद्र जोशी | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ३०६, तिसरा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-१४४४७-२०२१ | २०/१०/२०२१ |
| २८ | विलास कृष्णा ठाकूर | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ४०१, चौथा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-३०४२-२०२१ | १७/०२/२०२१ |
| २९ | रुपेश सुरेश कनगुटकर सुमिता रुपेश कनगुटकर | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ४०२, चौथा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-१५९९९-२०२१ | २२/११/२०२१ |
| ३० | रोहिणी रित्येम कर्जावकर | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स | सदनिका क्र. ४०६, चौथा मजला, स्वस्तिक रेसिडन्सी, मौजे पालीदेवद | पवल-२-१४९११-२०२१ | २८/१०/२०२१ |

वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# आज भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया सेमीफायनल

## १९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धा

**अँटिग्वा : वृत्तसंस्था**

१९ वर्षांखालील विश्वचषक स्पर्धेत भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यामध्ये दुसरा उपांत्य सामना बुधवारी (दि. २) अँटिग्वा येथील कूलिज क्रिकेट मैदानावर होणार आहे. बांगलादेशचा पराभव करून भारताने, तर पाकिस्तानचा पराभव करीत ऑस्ट्रेलियाने उपांत्य फेरीत प्रवेश केला. भारताने विक्रमी १०व्यांदा उपांत्य फेरी गाठली.

अंडर-१९ वर्ल्डकपमध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आतापर्यंत सात वेळा सामना झाला आहे. यापैकी भारताने पाच सामने जिंकले आहेत, तर ऑस्ट्रेलियाचा संघ दोन सामने जिंकू शकला आहे. २००० ते २०२० कालावधीतील या दोन संघांमधील शेवटच्या पाच सामन्यांत प्रत्येक वेळी टीम इंडियाने विजय मिळवला आहे. यंदाच्या विश्वचषक स्पर्धेतील सराव सामन्यातही भारताने ऑस्ट्रेलियाचा पराभव केला. अशा स्थितीत पुन्हा भारताचे पारडे जड आहे.

भारतीय संघ : यश धुल (कर्णधार), शेख रशीद, आराध्या यादव, दिनेश बाना, राज बावा, अनिश्वर गौतम, राजवर्धन हेंगरगेकर, हरनूर सिंग, मानव पारख, विकी ओसवाल, अंगक्रिश रघुवंशी, रवी कुमार, गर्व सांगवान, सिद्धार्थ यादव, निशांत सिंध, कौशल तांबे.

ऑस्ट्रेलियाचा संघ : कूपर कोनोली (कर्णधार), हरकीरत बाजवा, एडन काहिल, जोशुआ गार्नर, आयझॅक हिंगिस, कॅम्पबेल केलावे, कोरी मिलर, जॅक निस्बेट, निवेथन राधाकृष्णन, विल्यम शुल्झमन, लचलान शॉ, जॅक सेनफेल्ड, टॉम विलेनेल, टोबियास स्नेल.

# भारतीय महिलांकडून चीनचा धुव्वा




**मस्कत : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने सोमवारी 'एफआयएच' प्रो लीग हॉकीमध्ये विजयी पदार्पण करताना सलामीच्या लढतीत चीनचा ७-१ असा धुव्वा उडवला.

यंदा मस्कत (ओमान) येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रो लीग हॉकी स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असून भारतीय महिला संघाला प्रथमच यामध्ये खेळण्याची संधी लाभत आहे. त्यांनी चीनविरुद्धच्या सामन्याला आक्रमक सुरुवात केली. पाचव्या मिनिटाला नवनीत कौरने गोल करत भारताला १-० अशी आघाडी मिळवून दिली. १२व्या मिनिटाला नेहाच्या गोलमुळे भारताची आघाडी दुप्पट झाली.

उत्तरार्धात भारताच्या आक्रमणाला अधिकच धार आली. ४०व्या मिनिटाला अनुभवी वंदना कटारियाने भारतासाठी तिसरा गोल केला. त्यानंतर चीनने ४३व्या मिनिटाला सामन्यातील एकमेव गोल नोंदवला, मग शर्मिला देवीने सलग दोन मिनिटांत दोन गोल झळकावत भारताला ५-१ अशी आघाडी मिळवून दिली. अखेर ५०व्या मिनिटाला गरुजत कौर, तर ५२व्या मिनिटाला सुशिलाने गोल झळकावल्याने भारताने हा सामना ७-१ असा फरकाने जिंकला.



# दिल्लीची मुंबईवर सरशी

## प्रो कबड्डी लीग

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

प्रो कबड्डी लीगमध्ये अटीतटीच्या लढतीत शेवटच्या क्षणी दिल्लीने सामना आपल्या बाजूने फिरवत यू मुंबाला ३६-३० अशी मात दिली. सामना संपण्यासाठी दोन मिनिटे शिल्लक असताना मुंबाचा संघ ऑलआऊट झाला आणि दिल्लीला तीन गुण मिळाले.

या सामन्यात दिल्लीच्या विजय मलिकने १२, तर आशु मलिकने आठ गुणांची कमाई केली. मनजीत चिल्लरने अप्रतिम बचाव करत चार गुण मिळविले. दुसरीकडे मुंबईकडून अभिषेक सिंगने आठ, तर शिवमने सहा गुण घेतले.

तत्पूर्वी पहिल्या सामन्यात रेडर विकास कंडोलाच्या नेतृत्वाखाली हरयाणा स्टीलर्स संघाला गुजरात जायंट्सकडून पराभव पत्करावा लागला. अजय कुमार आणि प्रदीप कुमार यांच्या चमकदार कामगिरीमुळे गुजरातने चौथ्या विजयाची नोंद केली आणि हरयाणाचा ३२-२६ असा पराभव केला. अजय कुमारने ११ आणि प्रदीपने १० गुण मिळवले.

या सामन्यात गुजरातने सुरुवातीपासूनच चांगला खेळ दाखवला. बचावपटू सुनील कुमारच्या नेतृत्वाखाली गुजरातने पूर्वार्धातच सात गुणांची आघाडी घेतली. पहिल्या हाफमध्ये गुजरातने १९ मिळवले, तर हरयाणा संघ १२ गुण जमा करू शकला. उत्तरार्धात हरयाणाने पुनरागमन करीत १४ गुण मिळवले. तर गुजरात संघाला या कालावधीत केवळ १३ गुण मिळू शकले. हरयाणा संघाला १५ सामन्यांत सहाव्या पराभवाला सामोरे जावे लागले. गुणतालिकेत हरयाणा चौथ्या स्थानावर आहे, तर गुजरात जायंट्स संघ ३३ गुणांसह ११व्या क्रमांकावर आहे.

# रणजी करंडक स्पर्धा १६ फेब्रुवारीपासून

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


स्थानिक क्रिकेटमध्ये महत्त्वाची मानली जाणाऱ्या रणजी करंडक स्पर्धेच्या बहुप्रतीक्षित हंगामाला १६ फेब्रुवारीपासून प्रारंभ होणार असल्याचे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) जाहीर केले. ५ मार्चपर्यंत या स्पर्धेचे साखळी सामने होतील.

कोरोनामुळे गेल्या वर्षी रणजी स्पर्धेचे आयोजन करणे शक्य झाले नाही. यंदाही १३ जानेवारीपासून २०२१-२२



वर्षांचा हंगाम सुरू होणे अपेक्षित होते, पण देशभरातील कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे स्पर्धा पुढे ढकलण्यात आली. २०१९-२०मध्ये झालेल्या अखेरच्या रणजी स्पर्धेतील अंतिम फेरीत सौराष्ट्रने बंगालला नमवले होते.

जैव-सुरक्षा परिघात होणाऱ्या या स्पर्धेतील साखळी सामने अहमदाबाद, कोलकाता, कटक, चेन्नई, गुवाहाटी, हैदराबाद, बडोदा, थिरुवनंतपुरम आणि राजकोट या नऊ शहरांत खेळवण्यात येतील. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या ३८ संघांपैकी प्रत्येकी चार संघांना आठ गटांत विभागण्यात येणार आहे, तर प्लेट गटात उर्वरित सहा संघांचा समावेश करण्यात येईल.




**देशभरातील कोरोनाचा आढावा घेऊन आम्ही शहरांची निवड केली असून खेळाडूंच्या आरोग्य सुरक्षेला आमचे प्राधान्य असेल. जूनमध्ये स्पर्धेतील बाद फेरीचे सामने रंगतील. या सामन्यांच्या ठिकाणांबाबतचा निर्णय पुढील काही महिन्यांनी घेतला जाईल.**

**-जय शाह, बीसीसीआयचे सचिव**

## टाटा महाराष्ट्र खुली टेनिस स्पर्धा

# युकीची विजयी सलामी; प्रज्ञेश गारद



**पुणे : प्रतिनिधी**

भारताचा अनुभवी खेळाडू युकी भांबरीने टाटा महाराष्ट्र खुल्या टेनिस स्पर्धेची संघर्षपूर्ण विजयाने सुरुवात केली. प्रज्ञेश गुणेश्वरनचे आव्हान मात्र पहिल्याच फेरीत संपुष्टात आले.

पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीतील सामन्यात युकीने स्लोव्हाकियाच्या जोसेफ कोव्हालिकला ६-७ (१०-१२), ६-२, ७-५ असे पराभूत केले. या सामन्याच्या पहिल्या सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी झुंजार खेळ केला. त्यामुळे या सेटमध्ये ६-६ अशी बरोबरी झाली आणि विजेता ठरवण्यासाठी टायब्रेकर खेळवण्यात आला. यात कोव्हालिकने १२-१० अशी सरशी साधत पहिला सेट आपल्या नावे केला.

यानंतर मात्र युकीने दमदार खेळ करताना दुसऱ्या सेटमध्ये ६-२ अशी बाजी मारली. त्यामुळे हा सामना तिसऱ्या आणि निर्णायक सेटमध्ये गेला. यात ५-५ अशी बरोबरी असताना युकीने सलग दोन गेम जिंकताना हा सेट ७-५ असा जिंकत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

प्रज्ञेशला पाचव्या मानांकित जर्मनीच्या डॅनियल अल्तामिरकडून ६-७ (५-७), २-६ असा पराभव पत्करावा लागला, तसेच फ्रान्सच्या बिगरमानांकित क्रेन्टीन हेल्सने सातव्या मानांकित रिकार्डस बेरांकिसला ६-१, ६-२ असा पराभवाचा धक्का दिला.

# भारताचा श्रीजेश सर्वोत्तम क्रीडापटू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय हॉकी संघाचा अनुभवी गोलरक्षक पीआर श्रीजेश यंदाच्या जागतिक क्रीडा स्पर्धामधील २०२१ वर्षातील सर्वोत्तम खेळाडूच्या पुरस्काराचा मानकरी ठरला आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जिंकणारा तो केवळ दुसरा भारतीय क्रीडापटू आहे. २०२०मध्ये भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार राणी रामपालने हा पुरस्कार पटकावला होता.



श्रीजेशने हा पुरस्कार मिळवताना स्पेनचा स्पोर्ट्स क्लाइम्बिंगपटू अॅल्बर्ट गिनेस लोपेझ आणि इटलीचा वुशूपटू मिशेल जिओर्डानो यांना मागे टाकले. टोकियो ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय पुरुष हॉकी संघाचा सदस्य श्रीजेशला सर्वाधिक १,२७,६४७ मते मिळाली. या पुरस्काराचा मानकरी ठरणे ही माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट असल्याचे तो म्हणाला.

# भेंडखळ क्रिकेट अकॅडमीची फायनलमध्ये धडक

**उरण : वार्ताहर**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे १४ वर्षांखालील मुलांच्या खुल्या ४० ओव्हर क्रिकेट स्पर्धेत यूसीएसए उरण संघाचा दणदणीत पराभव करून भेंडखळ क्रिकेट अकॅडमीने फायनलमध्ये धडक मारली आहे.

भेंडखळ संघाच्या निर्जर पाटीलने ८५ धावांची तंत्रशुद्ध खेळी केली. स्मित म्हात्रे योन तीन बळी घेतले, तर धीरज ठाकूरने शेवटच्या षटकात चांगली फलंदाजी केली.



संघाच्या या कामगिरीबद्दल भेंडखळ क्रिकेट अकॅडमीचे सर्व खेळाडू, तसेच अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष मनोज भगत, प्रशिक्षक शरद म्हात्रे, विशाल ठाकूर यांचे कौतुक होत आहे. अकॅडमीचे प्रमुख प्रशिक्षक नयन कट्टा हे खेळाडूंना तांत्रिक व मानसिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी खूप मेहनत घेत आहेत.

# आयपीएल मेगा ऑक्शनची घोषणा

## १२ व १३ फेब्रुवारीला बंगळुरूमध्ये लिलाव प्रक्रिया

**मुंबई : प्रतिनिधी**

अखेर प्रतीक्षा संपली आहे. आयपीएल २०२२साठीच्या मेगा ऑक्शनच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. १२ आणि १३ फेब्रुवारी रोजी बंगळुरूमध्ये मेगा ऑक्शन होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

आयपीएल मेगा ऑक्शनसाठी ५९० खेळाडूंनी आपले नाव नोंदवले आहे. प्रत्येक संघाला तीन खेळाडू रिटेन करण्याची परवानगी होती. यंदा १० संघ स्पर्धेत खेळणार आहेत. आयपीएलच्या १५व्या मोसमात अहमदाबाद आणि लखनऊ असे दोन नवे संघ जोडले गेले आहेत. त्यामुळे स्पर्धेचा थरार आणखी वाढणार आहे.

या खेळाडूंपैकी २२८ कॅप्ड आणि ३५५ अनकॅप्ड आहेत. कॅप्ड म्हणजे ते भारतासाठी किंवा इतर कोणत्याही देशासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळले आहेत. त्याच वेळी अनकॅप्ड खेळाडूंचा अर्थ असा की त्यांनी भारत किंवा इतर कोणत्याही देशांतर्गत क्रिकेट किंवा लीग क्रिकेट खेळले आहे, परंतु त्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्याची संधी मिळाली नाही. या मेगा लिलावात असोसिएट नेशन्सचे सात आपले नशीब आजमवणार आहेत. यंदाची स्पर्धा सर्वांत मोठी होणार असल्याचेही सांगितले जात






## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. मेटल (धातू) क्षेत्रातील भारतातील सर्वाधिक बाजारमूल्य असणारी कंपनी कोणती?**

***अ.)*** टाटा स्टील ***ब.)*** जेएसडब्लू स्टील ***क.)*** हिंदाल्को ***ड.)*** वेदांता

**२. एफएमसीजी (फास्ट मुव्हिंग कन्झुमर गुड्स - जीवनावश्यक वस्तू) क्षेत्रातील भारतातील सर्वाधिक बाजारमूल्य कोणत्या कंपनीचे आहे?**

***अ.)*** हिंदुस्थान युनीलिव्हर ***ब.)*** गोदरेज कन्झुमर ***क.)*** नेस्ले इंडिया ***ड.)*** कोलगेट पॉमोलिव्ह इंडिया

**३. भारतातील आतापर्यंतचा सर्वांत मोठ्या रकमेचा आयपीओ कोणता?**

***अ.)*** कोल इंडिया ***ब.)*** जनरल इन्शुरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया
***क.)*** रिलायन्स पॉवर ***ड.)*** वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड (पेटीएम)






**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

***...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!***

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com